# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्रीबाबांनी आपल्या अचाट योगसामर्थ्याने पणत्यांमध्ये पाणी घालून ज्योत पेटवली आणि साऱ्यांना आश्चर्यचकित करून सोडले.

जून १९८२] [किंमत एक रुपया

श्री साईनाथ वाचनालय

जगा लावावे सत्पथी । हेंचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६२ वे ) किंमत १ रुपया ( अंक ३

जून १९८३

दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्रीसाई वाक्सुधा

सागरासी देता आलिंगन ।
सरिता विसरते सरितापण ।
तैसा भक्त येता शरण ।
नुरविसी दुजेपण भक्ताचे ॥१८॥

दोनी दीप एक होती ।
एकमेकां आलिंगन देती ।
तात्काळ हारपे द्वैतस्थिति ।
एकचि दीप्ति एकत्वे ॥१९॥

कर्पूर सोडूनि त्याची दृति ।
सूर्या सोडूनि त्याची दीप्ति ।
कनका सोडूनि त्याची कांति ।
राहिल कां निश्चिती वेगळी ॥२०॥

जैसी सागरीं रिघे सरिता ।
सागरचि होऊनि ठाके तत्वतां ।
अथवा लघण सागरी रिघता
सागरीं समसरता तत्काळ ॥२१॥

तेणे परी येता साईपदी शरण ।
भक्तांमाजी नुरे दुजें पण ।
भक्त होती समसमान ।
त्यागूनि मीपण आपुले ॥२२॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ५२ वा.



# सुवचन

चला लक्ष्मीश्चलाः प्राणाश्चलं जीवित यौवनम ।
चलाचले च संसारे धर्म एकोहि निश्चलः ॥

लक्ष्मी चंचल असते प्राण चंचल असतात. टवटवीत रसरसीत तारुण्यही चंचलच असते. पण संसार केव्हां केव्हा चंचल व केव्हा केव्हा अचंचल भासतो. पण धर्म एकटा मात्र सदैव निश्चल म्हणजे शाश्वतच असतो.

# अनुक्रमणिका जून १९८३


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | — | संतानी वासनेला जिंकले |
| २) | सद्‌गुरु श्रीनारायण महाराज | — | श्री. लक्ष्मण रापतवार |
| ३) | भक्ती आणि माणुसकी | — | कु. वत्सला आजगावकर |
| ४) | ध्यानी मनी तेच स्वप्नी दर्शनी | — | श्रीमती कमल बी. रेखी |
| ५) | माझी साईमाऊली | — | सौ. विजया करंडे |
| ६) | अतिशय क्षेत्र पैठण | — | |
| ७) | अंतर्यामी | — | श्री. पां. वा. भुतकर |
| ८) | संत श्री बसवेश्वर | — | |
| ९) | गणदेवीच्या श्री जानकीदेवी | — | डॉ. अ. का. पाठक |
| १०) | द्वारकामाई | — | सौ. मथुराबाई हिब्बारे |
| ११) | जेथे श्रद्धा तेथे साई | — | सौ. प्रेमला मैराळ |
| १२) | बाबांचे दोन अनुभव | — | श्री. सुरेश कुलकर्णी |
| १३) | बाबांची लीला अगाध आहे. | — | श्री. सच्चिदानंद रोडे |
| १४) | जयामनी जैसा भाव | — | सौ. विद्या दाभोलकर |
| १५) | असाध्य कॅन्सर बरा | — | श्री. लक्ष्मण देशपांडे |
| १६) | साईकृपेचा अनुभव | — | सौ. मीना वसंत मेहेर |
| १७) | बाबांनी लक्ष्मीचे रूपात दर्शन | — | श्री. हेमंत हळबे |
| १८) | बाबांचे दोन अनुभव | — | श्री. प्रभाकर गोडबोले |
| १९) | श्रीसाई कृपा | — | सौ. एन. एस. मालवणकर |
| २०) | संकट समयी धावती भक्तांसाठी | — | श्री. संजय गुमास्ते |
| २१) | ९ महिने व सच्चरित् | — | श्री. माधवराव गोरे |
| २२) | श्रीसाईलीला | — | श्री. विलास पडवळ |
| २३) | श्रीसाईनाथाय नमः | — | श्रीमती गुळाणिकर |
| २४) | श्रद्धा साईचरणी | — | श्री. राम घनावडे |
| २५) | शिरडीवृत्त | — | एप्रिल १९८३ |

# संतांनी वासनेला जिंकले

स. न. वि. वि.




गेल्या सहा-सातशे वर्षांच्या काळात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतांनी आपल्या काव्य वाङ्मयाच्या द्वारे, बोध-उपदेशाद्वारे महाराष्ट्र सारस्वतांची, भक्तांची अनुपम सेवा बजावली आहे. फार कशाला? मुसलमानी आक्रमणाला परतविणारी प्रवृत्ती, महाराष्ट्रात जर कुणी निर्माण केली असेल तर ती संतानीच होय. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनी संतांचे हे ऋण मान्य केलेले आहे.

आपल्या मराठी सारखी देशी भाषा लेखनिविष्ट व ग्रंथनिबद्ध होण्याच्या प्रारंभकाळी उत्तरेकडून व दक्षिणेकडून भक्तीधर्माचे प्रवाह महाराष्ट्रात येऊन एकत्र मिळाले. पंढरपूरचा विठ्ठल हा या दोन प्रवाहांचा संगमस्थान बनला. मराठी भाषेची वेल या भक्तीधर्माच्या रसाने पोषण पावू लागली. 'विवेकसिंधु' व 'अनुभवामृत' यांच्या सिंचनाने भक्तीपुष्पाना अधिकच बहर आला. आद्य व वंद्य असा मराठी साहित्याचा विजयस्तंभ म्हणजे ज्ञानेश्वरी होय. मराठी वाङ्मयीन युगाची प्रारंभीची ती यशोध्वजा आहे. महाराष्ट्रात भक्तीधर्माचे मुख्य अधिष्ठान भगवद्‌गीता बनली हे महाराष्ट्राचे इतर प्रांताच्या पेक्षा वेगळे असलेले वैशिष्ट्य होय. तेव्हां संतांचा सदुपदेश, त्यांचे वाङ्मय व त्यांचे मार्गदर्शन महाराष्ट्राला प्रेरक व स्फूर्तीदायक होऊन राहिलेले आहे. संत हे आम्हांला वेळोवेळी प्रेरणा देत आलेले आहेत. महाराष्ट्रीय संतांची योग्यता किती थोर आहे व कोणती उपकारक कामगिरी त्यांनी महाराष्ट्रीय भाविक जनतेसाठी पार पाडली यावर आम्ही वेळोवेळी लिहित आलो आहोत.

श्रीसंत ज्ञानेश्वरांपासून तो श्रीसंत साईबाबांपर्यंत महाराष्ट्रात होऊन गेलेले सर्व संत परमेश्वराच्या निकट पोहचलेले होते असे आम्हांस वाटते. त्यांनी आपल्या साहित्यातून, उपदेशवाणीतून, बोधामृतातून निष्काम कर्मयोगाचे तत्त्वज्ञान बहुजन समाजापर्यंत नेऊन पोचविले. केवळ निर्मोहामुळे संत परमेश्वराप्रत जाऊन पोचले. षड्‌रिपूंवर संतांनी ताबा मिळविला. वासनेला त्यांनी गिळंकृत

केले. वासनेचा परिहार करताना त्यांनी आपल्या जीवाला, देहाला अनंत कष्ट दिले. संतांनी वासनेवर मिळविलेल्या विजयासंबंधीची एक मजेदार कथा येथे सांगाविशी वाटते.

एकदा श्रीमहारुद्राच्या सन्मुख भोवताली शिष्य येऊन स्वामी समर्थ रामदास बसले असता, एका शिष्याने प्रश्न केला. "महाराज, वासना जिंकल्यावाचून जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका नाही म्हणतात, त्या वासनेचे रूप कसे आहे व तिचा परिहार कसा करावा."

श्रीसमर्थ म्हणाले, "वासनेचे रूप संकल्पात्मक आहे. व ती कोणत्या तरी वस्तूवर अधिष्ठित असते. ती निव्वळ हवेत नसते. तिला कसला तरी आधार लागतो. स्त्री, पुत्र, घरदार, शेतीवाडी, देश धर्म, समाज, बांधव, एखादे कार्य, एखादी संस्था इत्यादि अनेक वस्तु आहेत. एखाद्यावर प्रेम, कोणाचा द्वेष, असले काही ना काही तरी अधिष्ठान वासनेला लागते. जन्ममरणापासून सुटावयाचे तर जिवंतपणीच इतर वस्तूंवरील वासना काढून ती श्रीराम-समर्थ चरणी जडवावी म्हणजे अंतकाळी तीच वासना प्रबळ होऊन जीवात्म्याचे परमात्म्याशी तादात्म्य होईल." अशा अर्थाच्या अभंगानेच श्रीसमर्थांनी शिष्याच्या प्रश्नाला उत्तर दिले.

अंती पंच भूते पांचासी मिळाली । वासना राहिली कोणे ठायी ॥१॥
कोणे ठायी तेव्हां वासना हे राहे । कैसे रूप आहे वासनेचे ॥२॥
वासनेचे रूप सुक्षम जाणावे । संकल्प स्वभावे रूप तिचे ॥३॥
रूप तिचे अंतकाळी कोठे राहे । अनुभवे पाहे आपुलिया ॥४॥
आपुला संकल्प जये वस्तूवरी । तेथे वसती करी वासना हे ॥५॥
वासना हे वस्ती करी अगोदर । जव कळेवर सचेतन ॥६॥
सचेतन काया कारणी लावावी । वासना गोवावी रामरूपी ॥७॥
रामरूपी सत्यसंकल्प धरावा । संसार तरावा अवलीळा ॥८॥
अवलीळा भवसार वोसरे । जरी मनी धरे गुरुवाक्य ॥९॥
गुरुवाक्ये गती रामदासी झाली । मुक्ति हे लाधली सायोज्यता ॥१०॥

प्रश्न किती गहन, पण त्याचे उत्तर किती सुलभ, सहज समजण्यासारखे दिलेले आहे.

याच वासनेने एकदा श्रीसमर्थांसारख्या संतावरही आपला पगडा बसविला. त्या प्रसंगाची हकीगत फारच मजेदार पण उद्बोधक आहे.

समर्थांचा नित्याचा क्रम म्हणजे बहुधा ते एकटे एकीकडे भोजनास बसत. एकदा खीर केली होती. खावयाची तितकी खीर समर्थांनी खाल्ली. पण आणखी पाहिजे अशी त्यांना वासना झाली. आपणास अशी वासना व्हावी याचे त्यांना बरे वाटले नाहीं. वासनेची खोड मोडली पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले आणखी खीर मागीतली. शिष्या वेणाबाईनी वाढली. ती भुरकून 'आणखी वाढा' म्हणालेच. तीही वाढली आणि भुरकली. तरी 'आणखी वाढा' म्हणालेच. वेणाबाईना थोडे चमत्कारिक वाटले. कारण असे ते कधी मागत नसत. त्यांनी वाढली, ती संपली तरी यांचे 'आणखी वाढा' सुरूच होते. शेवटी खीर ओकून पडली. तरी 'आणखी वाढा' म्हणाले. खीर संपली होती. 'वासने, तुला आणखी खीर हवी ना?' असे म्हणून ओकलेली खीर भुरकून वासनेची खोड मोडण्यास समर्थ तयार झाले. इतक्यात वेणाबाईनी त्वरा करून ओकारीवर राख टाकली वासना जिंकलेल्या असाव्या. न जाणो पुढील अभंग समर्थांनी याच प्रसंगाला उद्देशून केलेला असेल.

वोकीता वोकीता मन कंटाळले । राखेने झाकिले सावकाश ॥१॥
सावकाश तया कोण अभिलासी । कोणाला असोसी करायाची ॥२॥
कासयाची आतां वासना धरावी । गोडी विवरावी विषयांची ॥३॥
विषयांची गोडी कंटाळले मन । नागवले जन असोसीचे ॥४॥
आसोसीचे जन ते जन्म घेईल । जीवची देईल विषयांसी ॥५॥
विषयांसी वीट मनापासुनीया । निर्वासना तया जन्म नाहीं ॥६॥
जन्म नाहीं ऐसे केले देवराये । वासना उपाये सोडविली ॥७॥
सोडविली देव दयानिधी । तुटली उपाधी सर्व काहीं ॥८॥
सर्वकाही काही हेचि हे प्रमाण । दासम्हणे खूण देव जाणे ॥९॥
देव जाणे सर्व राहिला विकार । ब्रम्ह निर्विकार दास म्हणे ॥१०॥

अशी आहे ही वासना.

# सद्‌गुरु नारायण महाराज

– श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार
किल्ला वॉटर वर्क्स, नांदेड.

* सद्‌गुरु नारायण महाराज हे एक अवतारी विभूतीपैकी एक होते. त्यांचा जन्म वऱ्हाडप्रांती चंद्रपूर जिल्ह्यातील वणी गावात पौष शुद्ध षष्ठी शके १८३२ रोजी झाला. त्यांचे वडील नरसोपंत वैद्य (ऋग्वेदी ब्राम्हण) होते. सद्‌गुरु सीताराम महाराज व नरसोपंत हे गुरु बंधू. दोघेही वासुदेवानंद सरस्वतींचे शिष्य. सीताराम महाराजांनी आपल्या गुरुबंधूस एकदा पुत्रदान मागितले. नरसोपंतांनी त्यांचा सर्वात लहान पुत्र नारायण महाराज दान करून संकल्प सोडला. ह्या अवतारी बालकाचे वय अवघे चौदा वर्षांचे होते. तेव्हाच त्यांनी सीताराम महाराजांचा अनुग्रह घेतला. त्यांना प्रत्यक्ष दत्तात्रयाचे दर्शन घडले व त्यांनी माहूर क्षेत्रात घोर अरण्यात कठोर तपश्चर्या करून सद्‌गुरु कृपा संपादन केली, व लोक कल्याणाच्या कार्याकरिता प्रगट झाले. त्यांचे हजारो शिष्य महाराष्ट्रात आंध्रात, व मध्यप्रदेशात पसरलेले आहेत.

सद्‌गुरु नारायण महाराजांची राहणी अगदी साधी होती. फक्त एक अंगरखा, धोतर, व पागोटे. एकाद्या खेडूताप्रमाणे त्यांचा पेहराव असल्यामुळे ते कोणी साधू, संत, सद्‌गुरु आहेत म्हणून लोकांना माहीत होत नसे, व लोकांची उपाधी टाळण्याकरिताच ते त्या वेषात राहत असत. त्यांनी एकांतवास घडावा म्हणून आपले आश्रम वापटी (ता बसमत, जि. परभणी, मराठवाडा) मुक्कामी डोंगरात उभारले होते, व त्यांचे नाव शक्ती ब्रम्हाश्रम असे ठेवण्यात आले. आडरान असल्यामुळे शिष्यांची व भक्तांची जास्त गर्दी होऊ नये म्हणूनच महाराजांनी हे स्थळ निवडले होते. परंतु ज्याच्या मनात सद्‌गुरुची खरी भक्ती असते, व साधुसंतांच्या दर्शनाची ज्यांना तळमळ लागलेली असते ते कोठेही काटेरी वनात देखील पोहोचतात. त्याचप्रमाणे नारायण महाराज खरे अवतारी पुरुष आहेत याची खात्री लोकांना पटू लागली तेव्हा आपोआपच वापटीच्या डोंगरात देखील भक्तांची रीघ लागली व संसारात त्रस्त झालेल्या लोकांना महाराजांच्या उपदेशाने शांती व समाधान लाभावयाचे. आश्रमात सकाळी व सायंकाळी प्रार्थना व्हावयाची. गायत्री मंत्राचा जप चालावयाचा व हवन होत राही. त्यातील ऊदी महाराज भक्तांना प्रसाद म्हणून देत असत. सद्‌गुरु सच्चिदानंद

साईबाबांप्रमाणेच त्यांची शिकवण होती. ते दुसऱ्याला उद्देशून काही म्हणावयाचे, परंतु ज्याची साक्ष त्यालाच पटावयाची. त्यांनी मुद्दाम म्हणून काही चमत्कार आपण होऊन दाखविला नाही. परंतु आपोआपच भक्तांना ते अधिकारी व साक्षात्कारी संत आहेत याची प्रचिती यावयाची. मृत बालक त्यांच्या नामस्मरणाने जिवंत झाला. बिना पेट्रोलची मोटार चालली, धावती रेलगाडी त्यांच्या आश्रमाजवळ थांबली वगैरे अनेक अनुभव भक्तांना आले आहेत. परंतु त्याचे श्रेय महाराजांनी स्वतःवर कधी येऊ दिले नाही. सद्गुरु सीताराम महाराजांचे नाव घेऊन ते आपल्या निष्ठावान भक्तास लग्नाकार्याच्या वेळी श्रीफळ देत असत, व तुझे कार्य निर्विघ्न पार पडेल म्हणून सांगावयाचे. एखाद्या वेळेस दिपवाळी निमित्त अथवा एखाद्या समारंभाच्या वेळी जास्त भक्त मंडळी त्र्यंबकालेकरासमवेत त्या डोंगराच्या ठिकाणी जमा होत असत. महाराज सर्वांना आपआपल्या परीने उपदेश करीत असत. ज्याच्या मनातील भावना त्यासच माहीती व्हावयाची. इतरांना त्याची कल्पना नसावयाची. लोक आनंदाने आपआपल्या घरी परत जात असत. त्यांचा संसार सुखाचा होई, व कुठल्याही संकटात ते सापडले तर सद्गुरु महाराजांचे नामस्मरण केल्याने त्यांचे विघ्न नाहीसे व्हावयाचे. त्यांच्या कृपा दृष्टीने अनेक शिष्यांचा व भक्तांचा उद्धार झाला. त्यांना गोरगरीब व पिडीत लोकांबद्दल जास्त चिंता वाटावयाची. त्यांच्या आश्रमात कुष्ठरोग्याकरिता काही झोपड्या निसर्गोपचाराकरिता बांधून ठेवल्या होत्या. महाराजांची किर्ती दिवसेंदिवस वाढत गेली, व शेकडोच्या ऐवजी हजारो शिष्य मंडळींचा समुदाय झाला. संतांचे कार्य अजबच असते. त्यांना सज्जन व दुर्जन, स्त्री व पुरुष समानच दिसतात. व त्यांच्या उपदेशाने सर्व पापे नाहीशी होऊन दुर्जन देखील सन्मार्गी लागून सद्गुरु चरणी लीन होत व मोक्षप्राप्तीचे अधिकारी बनत. संसार साधून परमार्थ कसा साधावा आणि नित्य व्यवहारात भक्तांनी कसे वागावे हे अगदी साधे व सहजपणाने सद्गुरुंनी शिकविले. परमेश्वराने जे काही दिले आहे त्यात सुख मानून समाधानी वृत्तीने राहण्याची शिकवण त्यांनी दिली. समाधी कालापूर्वी शेवटची गुरु पौर्णिमा परभणी मुक्कामी झाली तेव्हा त्यांनी भक्तांना सांगितले की माझे पाया पडू नका. ह्यात काय पडले आहे. हा देह नाशवंत आहे. माझ्या खडावाचे दर्शन घ्या, व माझ्या उपदेशाप्रमाणे चालत रहा. म्हणून भविष्यवाणी केली. त्यानंतर थोड्याच कालावधीत ते आजारी पडले व ते हिंगोली (जि. परभणी, मराठवाडा) मुक्कामी आपल्या शिष्यमंडळीकडे गेले. त्यांनी आपले समाधीस्थान पडल्या पाण्यात जाऊन शिष्यगणांस दाखवून दिले व हे माझे समाधी स्थान आहे म्हणून

शिष्यांना त्या जागेवर दगड रोवण्यास सांगितले व भाद्रपद शुद्ध ११ शके १८७८ मध्ये ते पंचत्वात लीन पावले. दरवर्षी या तिथीला त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

मी दहा वर्षापूर्वी सद्गुरु नारायण महाराजांचा उपदेश घेतला. त्याचे कारण असे झाले की, मी आजारी पडलो. साईसत्‌चरित्राचे पारायण केले. त्यानंतर माझ्या मेव्हण्याने मला गुरु चरित्राचे पारायण करण्यास सांगितले. पडल्या पडल्या मी त्याचे पारायण केले. तत्पूर्वी मी माझे माय, बाप, कुलदैवत, गुरुवर्य सर्व काही साईबाबाच आहेत असे समजूनच वागलो. परंतु साईबाबांच्या चरित्रात बत्तीसाव्या अध्यायात साईबाबांनी स्वत: एक वणजाऱ्याची गोष्ट सांगून सद्गुरुचे महत्त्व पटवून दिले आहे, व त्यांच्याच प्रेरणेने मी सद्गुरु नारायण माऊलीचा उपदेश घेतला.

शेवटच्या क्षणी सद्गुरु नारायण महाराजांनी आपले वापटीतल्या डोंगरात असलेले शक्ती ब्रम्हाश्रम अस्तित्वात असलेली जागा का बदलली हा एक गूढ प्रश्न आहे. माझ्या पश्चात माझ्या शिष्य मंडळीस , भक्त गणास व लेकरां बाळास कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून हे रम्य स्थान त्यांनी निवडले असावे असे वाटते. हिंगोली ही व्यापार पेठ तालुक्याचे ठिकाण आहे. तेथे रेल्वे व एस.टी. दोन्हींची सोय आहे. गावाबाहेर फक्त एक मैलापेक्षाही कमी अंतरावर महाराजांचे समाधीस्थान आहे. त्याच्या जवळच एक खटकाळी मारुतीचे देऊळ आहे व गरबदशाह वलीचा दर्गापण आहे. दर गुरुवार, शुक्रवार, शनिवार व रविवारी ह्या ठिकाणी गावातील बरीच मंडळी दर्शनास येत असते. हिंगोली हे तालुक्याचे ठिकाण, शिर्डी व शेगाव ह्यांचा मध्यबिंदू म्हणण्यास हरकत नाही. महाराजांनी ज्या ठिकाणी समाधी घेतली त्या सर्वेनंबरच्या जमीन मालकाने चार एकर जागा शक्ती ब्रम्हाश्रमास दान करून टाकली. सध्या ह्या ठिकाणी समाधी मंदिराचे काम संपूर्ण झाले आहे. दोन खोल्या पत्र्याच्या भक्त मंडळीस उतरण्याकरता बांधल्या आहेत, नळ व लाईट वगैरेची व्यवस्था आहे. सद्गुरु नारायण महाराजांचे प्रिय शिष्य प. पू. पुरुषोत्तम महाराज (विचोरे गुरुजी) हे सद्गुरुची गादी सांभाळीत आहेत. त्यांनी आश्रमाची चोख व्यवस्था ठेवली असून सद्गुरु नारायण महाराजांचे चरित्र लिखाणाचे काम चालू आहे. हा लेख मी साईबाबा व सद्गुरुच्या प्रेरणेने लिहीत आहे. त्यांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम !

# भक्ती आणि माणुसकी

कु. वत्सला मु. आजगावकर,
पुष्पांजली, बी-३, गोशाळा लेन,
मालाड (पूर्व), मुंबई–६४.

● खरोखर श्री साईबाबांची आम्ही एवढी वर्षे भक्ती करून काय उपयोग? आमच्या स्वभावात थोडाही फरक पडत नाही. प्रत्येक साईभक्त म्हणवणाऱ्या भक्ताने आपलं आत्मनिरीक्षण, सिंहावलोकन करावं. मी माझंच सिंहालोकन करते तेव्हा असं वाटतं मला, वेळ आली की माझा मूळचा स्वभाव एकदम उचल घेतो. माझा मूळचा स्वभाव अत्यंत तापट, वेळ निघून गेली की मला एकदम पश्चात्ताप होतो. ह्या तापटपणाचा !

सत्व, रज आणि तम हे तिन्ही गुण प्रत्येक माणसामध्ये कमीअधिक प्रमाणात असतात. त्यापैकी रज आणि तम यांचं प्रमाण भक्ती करून कमी केलं पाहिजे. याचसाठी संतांचे अवतार असतात. ते ईश्वरी साक्षात्कार करून देतात. आपल्याला मार्ग दाखवतात, पण पुढची वाटचाल आपणच करायची असते.

माणसामधली माणुसकीची जाणीव करून द्यायला साईबाबांसारखे संत अवतार घेतात. आपण परत (पशू) खालच्या योनीला जाणार नाही याची आपणच खबरदारी घ्यावी लागते. ते अनुभव देतात पण प्रत्येक वेळेला त्यांना हाक मारणे योग्य नाही. ते आपला हात धरून मार्गावर आणून सोडतात. ते आपण त्या मार्गानेच गेलं पाहिजे, आपलं जीवन काळाच्या ह्या अथांग सागरामध्ये अस्तित्वशून्य आहे. त्याला फक्त एका बुडबुड्यापलिकडे किंमत नाही, तरीपण केवढा अहंपणा, केवढी दुसऱ्याला लुबाडण्याची वृत्ती, ही प्रवृत्ती जर साईबाबांची भक्ती करून कमी झाली नाही तर काय उपयोग त्या भक्तीचा? म्हणजे आपण साईदारचे याचकच झालो. काहीतरी मागण्यासाठी भक्ती करतो.

आपण आपल्या स्वार्थापेक्षा दुसऱ्याला मदत करणे, दुसऱ्यांची सेवा करणे, ही थोड्या थोड्या प्रमाणात प्रथम सुरू करावी. अशारीतीने स्वार्थ कमी करावा. त्यामुळे मनाची शुद्धी व देहाची शुद्धी व्हायला मदत होते. हे जगाला दाखवण्यासाठीच संत येत असतात. त्यांचा भक्त म्हणवणाऱ्या व्यक्तीने त्यांचा आदर्श ठेवून थोड्या प्रमाणात तरी तशी वृत्ती ठेवावी. तीच त्यांची खरी भक्ती.

मुक्तीच्या मार्गांपैकी भक्ती हा एक मार्ग आहे. मुक्तीविषयी बोलायचीसुद्धा आमची लायकी नाही. पण श्री बाबांसारख्या संतांची भक्ती करून आम्ही माणुसकीच्या तरी जवळ गेले पाहिजे. बाबांच्या चरित्रामध्ये काही उदाहरणे बाबांनीच दिली आहेत की बाबांची पूर्व जन्मी भक्ती करणारे जीव कोणी साप, कोणी बेडूक, कोणी शेळ्या असे अतिस्वार्थामुळे झालेले आहेत. हल्ली कोणत्या ना कोणत्या संताची किंवा देवाची भक्ती करणे हे पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात आढळते. पण इतर दुर्गुणही पराकोटीला गेलेले आहेत मग आम्ही माणुसकीच्या जवळ जातोय की दूर जातोय हेच समजत नाही.

## डॉ. होमी बाटलीवाला परलोकवासी



मुंबईतील एक प्रसिद्ध दानशूर होमिओपॅथिक डॉक्टर श्री. होमी ए. बाटलीवाला यांचे २० मार्च १९८३ रोजी मुंबई मुक्कामी वयाच्या ६८ व्या वर्षी देहावसान झाले. ते १९५२ सालापासून शिरडीस श्रीबाबांच्या प्रत्येक उत्सवास येत, बाबांचे दर्शन घेत व संस्थानाला देणगी दाखल बरीच रक्कम पण इस्पितळ कार्यासाठी, रोग्यांच्यासाठी देत असत. ‘साईबाबा अकाऊंट’ या नावाचे त्यांनी एक बँकखाते पण उघडले होते व त्या खात्यात ते आपल्या प्रॅक्टिस-मधील प्राप्त मिळकती पैकी काही रक्कम पण टाकत असत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र व दोन कन्यका आहेत. श्रीसाईबाबा मृताच्या आत्म्यास चिरशांती देवोत.



# श्रद्धांजली

ह्या मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक प्रा. द. दि. परचुरे ह्यांना हृदयविकाराचा जोरदार झटका दिनांक १-६-७३ ला आला आणि त्यातच त्यांचा अंत झाला. जरी प्रा. परचुरे हे मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते तरी मराठी व संस्कृत भाषेतील उपदेशपर, अध्यात्मपर व तत्त्वज्ञानपर वाङ्मयाचा त्यांचा व्यासंगही फार मोठा होता. तसेच ते महान साईभक्त होते. त्यामुळे प्रवचन व कीर्तन ह्याद्वारा ते साईभक्तीचा प्रचार अखंडपणे करीत असत. श्री साईबाबांच्या चरित्रावर त्यांनी आठ कीर्तने रचली होती. ती शिर्डी संस्थानने "साई कीर्तनमाला" ह्या नावाने प्रसिद्ध केली आहेत. साईसच्चरित सप्ताह ज्या ठिकाणी करावयाचा असतो त्या ठिकाणी करण्यासाठी ही कीर्तने हरिदासांना फार उपयोगी पडतात असा हरिदासांचा अभिप्राय आहे. ती कीर्तने इतकी रसाळ आहेत की त्यांच्यामुळे समग्र साईचरित्र लोकांच्या डोळयापुढे त्यांच्याद्वारे उभे रहाते.

लहान मुलांच्यावर केलेले संस्कार जन्मभर टिकतात हे लक्षात घेऊन साईबाबांचे गोष्टीरूप चरित्र प्रा. परचुरे ह्यांनी "मुलांचे साईबाबा" ह्या नावाने मराठीत व "चिल्ड्रेन्स साईबाबा" ह्या नावे इंग्रजीत लिहिले. तेही शिर्डी संस्थानने प्रसिद्ध केले आहे. अन्य भाषिक लोकांना ते इतके आवडले आहे की त्याच्या इतर भारतीय भाषांतील आवृत्त्या प्रसिद्ध होत आहेत. ह्या पुस्तकाच्या वाचनाने लहानपणापासूनच पुष्कळ मुलांना साईभक्तीचा लळा लागला आहे असे पुष्कळ वडील माणसे सांगतात.

साईभक्तीच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी प्रा. परचुरे ह्यांनी जे कार्य कीर्तने प्रवचने, पुस्तके, व प्रस्तुतचे मासिक ह्याद्वारे केले त्याकरिता त्यांच्या दहाव्या श्राद्धदिनी दिनांक १-६-८३ ला आम्ही त्यांना कृतज्ञतापूर्वक साई-लीलेच्या सर्व वाचक व लेखकांच्या वतीने ही श्रद्धांजली अर्पण करीत आहो.

—संपादक

# श्री साई संदेश मासिक

श्री साईबाबांच्या प्रचारकार्याला वाहिलेले धार्मिक मासिक "श्रीसाई संदेश"

भक्तांच्या प्रतिक्रिया

'श्री साईसंदेश' आंतबाहेर आकर्षक आहे. अंक कसलेल्या संपादकाने तयार केल्यासारखा वाटला. **—डॉ. आर. एस. कापडी** राजारामपुरी, कोल्हापूर.

श्री साईबाबांच्या जीवनाचे निरनिराळे पैलू दूरदूरपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी सहाजिकच संपादकीय मंडळीवर पडते. त्यादृष्टीने कर्ते मंडळी सतत कार्यरत रहातील. हे मासिक संग्राह्य व वाचनीय अभिलेख म्हणून गणले जाईल अशी अपेक्षा करणे चुकीचे होणार नाहीं.

**—ना.शंकरराव चव्हाण,** नियोजन मंत्री.

कोपरगाव सारख्या तालुक्याच्या ठिकाणी इतकी उत्कृष्ट छपाई होऊ शकते यावर माझा विश्वास नव्हता. श्रीसाईच्या कर्तृत्वभूमीत आपणास हे यश लाभले त्याबद्दल परत एकदा अभिनंदन श्रीसाईसंदेश अंक सुबक आणि श्रीसाईच्या कृपाप्रसादाने विपुल माहितीसाठी नटलेला आहे.

**—श्री. पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, प्रा. लि. वडाळा

श्री साईसंदेश भक्तीच्या तळमळीतून काढलेले मासिक म्हणजे भक्तांना सात्विक आनंद आहे. मासिकातील लिखाण भक्तांचे चित्त वेधून घेण्या इतके सरस आहे.

"**श्रीसाई संदेश**" साईसाहित्यात निश्चितच मानाचे स्थान निर्माण करील.

**—श्री. रमेश डी. चव्हाण,** नवापूर, जि. धुळे

आपने श्री साईबाबाके संदेश को फैलाने के लिये श्री साईसंदेश मासिकका प्रकाशन करके हम साईभक्तों, लेखकों, ऑर कवियोंपर बडा उपकार किया है। मासिक बडा सुंदर, लेख और कवितायें भक्तीप्रधान भावनात्मक दार्शनिक है ; भगवान साईबाबा आपको यश दें ।

**—प्रा. गुंडेराव पटवारी,** एन. एफ. जे. कॉलेज, बिदर, कर्नाटक

श्री साईसंदेश मासिक साईभक्तांना आवडेल असेच आहे.

श्रीसाईबाबा व त्यांच्या समकालीन संतावर लिखाण करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. **— दैनिक "नवाकाळ"** मुंबई.

श्री साईभक्तांच्या नावाची सूची (डायरी) साठी भक्तांनी संपूर्ण पत्ता, व्यवसाय, अनुभव पाठवावा.

**सवलतीची वार्षिक वर्गणी रु. ३०/-**

**संपर्क : अशोक खांबेकर, संपादक "श्रीसाई संदेश"**

कोपरगाव ४२३६०१ जिल्हा — अहमदनगर

# ध्यानी मनी तेच स्वप्नी व दर्शनी

– सौ. कमल बी. रेखी
सरकारी कर्मचारी वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई–५१.

● खाली दिलेला अनुभव माझ्या मातोश्री श्रीमती कृष्णाबाई उर्फ माभी मु. ढेपे यांना प्रत्यक्ष आला असून, त्यांच्या शब्दात मी लिहून पाठवित आहे. कारण त्या ८२ वर्षांच्या असून त्यांच्या क्षमू दृष्टीने लिहिणे होत नाही. त्या गेली २५ वर्षे माझ्याचकडे आहेत.

आमच्या कुटुंबात नियमितपणे झोपण्याच्या अगोदर श्रीसाई स्तवन–भजन वगैरे असते. मी व आई व इतर कुटुंबीय स्नानानंतर साईस्तोत्र वाचतोच. गेल्या सुमारे सहा महिन्यांपूर्वी रात्रीच्या भजनानंतर माझ्या आईने बाबांना नमस्कार करून मनात म्हटले की, बाबा मला आपले प्रत्यक्ष दर्शन होईल का ? त्याच रात्री नंतर पहाटेच्या वेळी माझ्या आईला साईबाबांच्या फोटोच्या खाली बाबांची मूर्ती भिक्षेसाठी निघालेल्या स्वरूपात दिसली. तिला खूप आनंद झाला. ती मनात म्हणाली, " बाबांना काय भिक्षा घालावी. ?" तिने दुसऱ्या खोलीत जाऊन ताटात तांदूळ घेऊन बाबांना ती भिक्षा घालू लागली. त्यावर ते म्हणाले, " भिक्षा कशाला ? बरे आणलीस तर घाल" मग आईने त्यांच्या झोळीत भिक्षा घातली व नमस्कार केला. पायावर डोके ठेवताना ती देहभान विसरून गेली. सकाळी उठल्या-नंतर हा दृष्टांत तिने मला सांगितला. मी म्हणाले, " अग तुला, प्रत्यक्ष बाबांनी दर्शन दिले. नित्यक्रमानुसार ज्या हॉलमध्ये आम्ही झोपतो व जेथे बाबांचा फोटो आहे. तो हॉल मी साफसूफ करू लागले. फोटोच्या खालची जागा साफ करताना तेथे तांदळाचे दाणे पडलेले प्रत्यक्षात आढळून आले. आईने सांगितलेल्या दृष्टां-ताची सत्यता पटली. ते दाणे आम्ही डबीत भरून देव्हाऱ्यात ठेवले व नियमाने त्याची पूजा करतो. अशा तऱ्हेने बाबांनी प्रत्यक्षात येऊन आईला दर्शन दिले व तिची इच्छा पूर्ण केली.

खरोखर ध्यानी मनी तेच स्वप्नी व दर्शनी हे खरे नाही असे कसे म्हणावे ?

# माझी साईमाऊली

-- सौ. विजया सुधीर करंडे
६-१४८, ओ.एन.जी.सी. ऑफिसर्स फ्लॅटस्,
रूपनगर, बांद्रा, (पूर्व)
मुंबई--४०० ०५१.

● माझे मामा हर्द्याचे श्री. गणपतराव नाईक ह्यांच्यामुळे आमच्या कुटुंबातील सर्वांना श्री साईबाबांची ओळख झाली. माझे मामा, जवळ जवळ १९५२–५३ साली त्यांना बाबांनी प्रत्यक्ष दर्शन दिल्यापासून शिरडीला न चुकता जातात. ते सदैव साई चिंतनात रममाण असतात. आमच्याशी बोलताना ते नेहमी बाबांच्या अगाध लीलेबद्दल सांगत असतात. बाबा सर्वत्र अव्यक्तरूपाने वावरत असतात, व तुमच्या कळकळीच्या हाकेला ते लगेच धावून येतात असे ते नेहमी म्हणतात. माझी सौ. मामी तसेच आई-वडिल सर्वच साईभक्त. असे सर्व वातावरण असल्यामुळे साहजिकच बालपणापासून आम्ही बहिण भावंडे पण साईबाबांची आपापल्या परीने भक्ती करू लागलो. कुठेही जाण्यापूर्वी बाबांना नमस्कार करून व त्यांचा अंगारा लावल्याशिवाय आम्ही घराबाहेर पडत नाही.

माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात प्रत्येक अडीअडचणीच्या वेळी मला बाबांचा फार मोठा आधार वाटत आला आहे. माझ्या सगळ्या इच्छा बाबांनी पुऱ्या केल्या आहेत. मला कितीतरी लहान-मोठे अनुभव आले आहेत. त्यावरून साईबाबा किती दयाळू कृपाळू आहेत हे दिसून येतं.

१९७६ साली माझी आई आजारी झाली होती. घरगुती उपचार झाले. फॅमिली डॉक्टरचे औषध झाले, पण तिच्या दुखण्याला आराम मिळत नव्हता व रोगाचे निदान पण होत नव्हते. त्यावेळी एके दिवशी पहाटे मी झोपेत असताना "आईला अमक्या हॉस्पिटलमध्ये ने ' असे कुणीतरी माझ्या कानात सांगितले. माझ्या आईला ते पटले नाही. पण शेवटी त्याप्रमाणे दाखवल्यावर रोगाचे निदान बरोबर झाले, व योग्य तो औषधोपचार झाल्यामुळे बाबांच्या कृपेने तिच्या प्रकृतीत तेव्हा सुधारणा झाली. ही 'कानगोष्ट' सांगणारे बाबांशिवाय अर्थात् दुसरे कोण असणार ?

माझी आई सौ. सरला धामापूरकर (नागपूर) ही पण अतिशय साईभक्त होती. ती पुण्यवान होती. तिचा मृत्यू पण थोडयाशा आजारपणात ता. १०–१२–१९८१ ला दत्तजयंतीसारख्या पवित्र दिवशी (तोच तिचा जन्मदिवस पण होता) झाला. मला इकडे तिच्या आजारपणाची काहीच खबर नसल्याने व अचानक ही दु:खाची बातमी समजल्याने मी अतिशय दु:खी झाले. दु:खाने अक्षरश: वेडी झाले. मी माझ्या बाबांवर पण रागावले. ज्या बाबांनी पांच वर्षांपूर्वी माझ्या आईला मोठ्या दुखण्यातून वाचवले होते, ज्यांनी प्रत्येक वेळी माझे गाऱ्हाणे ऐकले होते, ज्यांच्या कृपेने माझे सर्व व्यवस्थित झाले, त्यांनी मला माझ्या लाडक्या आईबद्दल काहीच कसे सुचवले नाही ? माझ्याकडून काय अपराध घडला असावा ? जर मला आईच्या आजाराचे आधी समजले असते तर माझ्या कळकळीच्या विनवणीला बाबांना नेहमीप्रमाणे धावून यावे लागले असते, व माझ्या आईला वाचवावे लागले असते. मी माझ्या माहेरच्यांवर – स्वत:वर खूप रागावले, पण ......? " ह्या विश्वाचा कारभार ठीक चालण्यास जन्म-मृत्यूचे चक्र तर चालायलाच हवे. ", या जगात जन्मलेला माणूस हा कधी ना कधी मरणारच. कोणीही अमरपट्टा घेऊन आलेला नाही. तुम्हा आम्हाला पण एक दिवस या जगातून जायचेच आहे. तुझी आई इतकी पुण्यवान होती की तिला दत्तजयंतीसारख्या चांगल्या दिवशी, जास्त त्रास न होता, सौभाग्याचे मरण आले, असा उपदेश मला माझ्या मामांनी केला. जणूकाही साईबाबांनी त्यांच्या तोंडून माझे सांत्वन केले.

आता हल्लीची गोष्ट सांगते. माझ्या वडिलांची–त्यांना आम्ही नाना म्हणतो. अंगठी ते उन्हाळ्यात माझ्याकडे आले असताना हरवली. एके दिवशी रात्री, त्यांच्या बोटातून अंगठी पडल्याचे लक्षात आले. कुठे पडलो काहीच अंदाज येईना. आंघोळीच्या वेळी मोरीतून तर गेली नसेल वगैरे अनेक विचार माझ्या मनात आले. मी चटकन् साईबाबांच्या फोटोवर डोके टेकले व म्हटले, "देवा, नानांची अंगठी मिळू दे. मी ही घटना साईलीलेत लिहून पाठवीन." आणि हे म्हणून मी वळले असेन तर माझी दृष्टी बेसिनच्या खाली पडलेल्या अंगठीकडेच प्रथम गेली. बाबांची ही लीला बघून तर मी अतिशय थक्क झाले. माझे हृदय आनंदाने – भक्ती – श्रद्धेने भरून आले. खरंच ही साईमाऊली किती कृपाळू दयाळू आहे. तिचे गुणगान गाण्यास माझे शब्द अपुरे पडतात.. अशा बाबांची कृपादृष्टी तुम्हा-आम्हां सर्वांवर सतत राहो अशी प्रार्थना करून हा लेख संपवते.

ॐ

# महाराष्ट्रामधील प्राचीन सुप्रसिद्ध दिगंबर जैन अतिशय क्षेत्र–पैठण

**० महाराष्ट्रात पैठण नगरीला एक खास वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. शककर्ता शालिवाहनाची राजधानी, संत एकनाथांची कर्तुत्वभूमी यासाठी पैठण प्रसिद्ध आहेच. यासेरीज जैन धर्मियांच्या बाबतीतही पैठणला महत्त्व आहे. विशेषतः दिगंबर जैनांची काशी म्हणून पैठणचे महत्त्व उल्लेखनीय व लक्षणीय आहे.**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आणि मंगल पवित्र तीर्थ क्षेत्राची गंगोत्री आहे. क्षत्रियांना वीररसाची स्फूर्ती देणारी व संतांना आध्यात्मिक सर्वोच्च शिखरावर चढवणारी या पवित्र भूमीत अत्यंत प्राचीन आणि विश्वविख्यात शालिवाहन (सातवाहन) जैन राजाची राजधानी (प्रतिष्ठान) पैठण. दिगंबर जैनांची काशी पैठण या नावाने ख्याती आहे. मराठवाड्यातील औरंगाबाद शहरापासून दक्षिणेकडील साधारणतः ३२ मैलांवरील श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र पैठण हे जैनांचे अतिप्राचीन पवित्र श्रद्धास्थान. येथे जैनाचे २० वे तीर्थंकर भ. मुनी सुव्रतनाथांची अत्यंत प्राचीन मूर्ती केवळ वाळूने राजा खरदूषणने तयार करून प्रतिष्ठित केली असून मर्यादा पुरुषोत्तम भ. रामचंद्रजीने मोठ्या उत्साहाने पूजा केली असा उल्लेख आढळतो. मूर्ती चमत्कारयुक्त दार्शनिय मनमोहक आणि भक्तांचे मनोवांछित फल पूर्ण करणारी असून मंदिराच्या भुयारात पूर्वाभिमुख अशी प्रतिष्ठित केली आहे. मूर्तीचे आकर्षणच इतके आहे की, सारखे पहात राहिलं तरी मनाची तृप्ती होत नाही. या अप्रतिम भव्य मूर्तीचे दर्शन घेताच ही मूर्ती अतिप्राचीन चतुर्थकालीन असली पाहिजे याची खात्री पटते. या अतिशय चतुर्थकालीन मूर्तीची निर्मिती कथाही तशीच अद्भूत आहे.

## प्राचीन ऐतिहासिकता

भगवान रामचंद्राचा काळ होता. राजा खरदूषण आपल्या राणीसह वनक्रीडा करण्यासाठी दंडकारण्यात आले. दंडकारण्यातील ते रमणीय वातावरण त्यांना आकर्षक वाटले. संध्याकाळ झाली तरी त्यांना परत राजधानीकडे जावे असे वाटेना. मुक्काम दंडकारण्यातच पडला. दुसऱ्या दिवशी प्रातःविधी आटोपून

राजाराणीसह फिरावयास निघाले. दंडकारण्यच ते ! विविध वृक्ष राजानी नटलेला तो परिसर अनेक वनचरांनी समृद्ध असा भाग. फिरता फिरता दुपार केव्हा झाली ते राजाला समजलेच नाही. मुक्कामापासून बरेच ते दूर आलेले, राजाराणीला कडकडून भूक लागलेली. परंतु मुक्कामाकडे जावे तर ते बरेच दूर. जिनदर्शन घेतल्याशिवाय अन्न ग्रहण करावयाचे नाही ही प्रतिज्ञा. राजाला मोठी चिंता निर्माण झाली. जिनदर्शन तर व्हावयास पाहिजे. आजूबाजूस जीन प्रतिमा असणे अशक्यच. दंडकारण्य ना ते. तेथे ना नदी नाले चहुबाजूंनी रंगीबेरंगी पुष्पलता पसरलेल्या. झाडेझुडपे याशिवाय दुसरे काय असणार ! ते ज्या ठिकाणी आले ते प्रतिष्ठानच्या गोदानदीचे मंगल पवित्र पात्र. त्यादिवशी दोघांनी उपवास केला. गोदा-तीरी मुक्काम झाला. प्रधानजी व सैनिक शोधत तिथे आले.

प्रातःकाली उषाच्या आगमनप्रसंगी चहूकडे निसर्गरम्य वातावरण सुगंधित झाले. राजाच्या मनात एक विचार आला. या पवित्र निसर्गरम्य ठिकाणी आपण भगवंताची मूर्ती तयार केली तर आपला विचार राजाने राणीला व प्रधानाला बोलून दाखविला. दोघांना अत्यंत आनंद वाटला. मग काय ? झटपट राजाने नदी पात्रात जाऊन वाळू आणली व विशालकाय मूर्ती करण्यात मग्न झाला. थोड्याच वेळात अर्धपद्मासन, ध्यानस्थ विशालकाय अप्रतिम वाळूची मूर्ती तयार झाली. भ. मुनीसुव्रतनाथ तीर्थंकारांचे तो तीर्थाचा काळ. तयार केलेल्या मूर्तीस श्री १००८ मुनी सुव्रतनाथ भगवंताची प्रतिष्ठापना करण्यात आली. राजा खरदूषणाने राणीसहित दर्शन घेतले. मोठ्या समारोहाने यथाविधी पूजा अर्चा केली. नंतर राजाराणीने भोजन केले, राजा खरदूषण आपल्या राणी-सह राजधानीत परतले. गोदातीरच्या त्या ठिकाणी अप्रतिम भव्य सुंदर जिन चैत्यालय बांधण्याची आज्ञा दिली. भव्य जिनमंदिर बांधण्यात आले. तीच आज प्रतिष्ठान पैठण शहरातील भुयारातील शनिग्रह तीर्थंकर अरिष्ट निवारक मूल-नायक श्री १००८ मुनीसुव्रतनाथ जैनाचे विसावे तिर्थंकर भगवंताची मूर्ती लाखो वर्षे झाली आजही ही मूर्ती अप्रतिम दिसते.

मुंबई येथील ऐलक पन्नालाल सरस्वती भुवनमध्ये द्विज विश्वनाथलिखित एक गुटिका आहे. त्यात तेरा छप्पम छंद आहेत. सर्व क्षेत्राबरोबर पैठण क्षेत्राचेही वर्णन त्यात आढळते. त्याचप्रमाणे नाथुराम प्रेमी लिखित जैन साहित्य और इतिहास या ग्रंथात पान ३४५ व ४६५ वर प्राचीन प्रतिष्ठान म्हणजे सध्याचे पैठणच असून जिवंत सामिमुनीसुव्वय 'याप्रकारे जीवित स्वामी मुनी सुव्रतनाथ भग-वंताची प्रतिमा प्रगट झाल्याचा उल्लेख आढळतो.

प्रसिद्ध इतिहासतज्ञ प्रा. रा. श्री. मोरवंचीकर, जैन संस्कृतीच्या संदर्भात या लेखात लिहितात की गोदावरी काठीच पैठणच्या परिसरात अश्मयुगीन मानव राहत असल्याचे ऐतिहासिक पुरावे आता विपुल प्रमाणात उपलब्ध झाले आहेत.

दक्षिणेकडील सर्व धार्मिक व सांस्कृतिक चळवळींचा उगम पैठण येथूनच झाला असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. जैन, हिंदु, बौद्ध, हे पुरातन धर्म असून त्यांचा प्रतिष्ठानशी अगदी निकटचा संबंध आहे. या धर्मांचा दक्षिणेमध्ये प्रसार झाला, व पैठण हे या कार्याचे केंद्र होते. दक्षिण भारताच्या जैन प्रसारामध्ये पैठणचे महत्व आगळेच आहे. कारण, सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या कालखंडातच पैठणचा जैन धर्म सांप्रदायाशी निकटचा संबंध आला व या काळात पैठण हे जैन धर्माचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित झाले.

जैन परंपरेनुसार प्रसिद्ध आचार्य भद्रबाहू हे चंद्रगुप्त मौर्याच्या समकालीन होते. श्रवण बेळगोळला जाताना काही दिवस पैठणला वास्तव्य केल्याचा उल्लेख मिळतो.

एका पौराणिक सत्य कथेच्या आधारे शककर्ता जैन सम्राट शालिवाहन सुप्रसिद्ध माघनंदी आचार्यांचे पुत्र होते. अशा प्रकारचा उल्लेख दिल्लीहून प्रकाशित सन्मती संदेश मासिक वर्ष १७ अंक नंबर ६ मध्ये 'शालिवाहन शक का प्रारंभ कैसे' या लेखात श्री. सि. 'हू कम जैन 'कंचन' मऊरानी पुरकर यांनी केला आहे.

जैनांचे अनेक ग्रंथामध्ये पैठणचे उल्लेख विपुल प्रमाणात आले आहेत व या उल्लेखाद्वारे पैठणशी अनेक ऐतिहासक व सत्यदंतकथांचे संबंध जोडण्यात आले आहेत.

प्राचीन साहित्यात बृहत्कल्प सूत्रभाष्य, इत्यादी तसेच जिनसेनाचे आदिपुराण, जैन, रामायण प्रबंध चिंतामणी या विविध प्रवार्चीन साहित्यात पैठणचा उल्लेख मिळतो.

हरिवंश पुराण, पद्मपुराणातही दंड करण्यात प्रभू रामचंद्राचा विहार झाला. त्यावेळी त्यांनी सीता लक्ष्मणासह या प्रतिमेची पूजा केल्याचा उल्लेख आढळतो.

मूळ प्रतिमा आजही भुयारातच आहे. अनेक चमत्कार नि सातिशयता यामुळे ही प्रतिमा जैनांची आराध्यदेवता ठरली आहे.

आपण इतिहासात मोगल राजांनी हिंदू धर्माचा ऱ्हास करण्यासाठी हिंदूच्या ऐतिहासिक धार्मिक स्थळांचा नायनाट केल्याचे वाचतो. त्याचे प्रत्यंतर भारतातील इतर ठिकाणाप्रमाणे या भागात आजही पहावयास मिळते. सुप्रसिद्ध एलोरा अजिंठा या प्राचीन ठिकाणच्या शिल्पकलेचा त्यांनी केलेला विध्वंस सर्व परिचित आहे. अशा प्रकारच्या विध्वंस करून मोगल राजांनी आपली अपुरी आकांक्षा पुरी केल्याचे दाखले आजही पहावयास मिळतात. त्यांच्या दृष्टीपासून हे नयनरम्य तथा अतिशय ठिकाण सुटणे अशक्यच. त्यांच्यापैकी अनेक सरदारांनी या अतिशय क्षेत्राची नासधूस करण्याचा प्रयत्न केला, परंतु, मंदिराच्या परिसरात आल्यावर त्यांची दृष्टीच नाहिशी होत असे. हे या प्राचीन प्रतिमेचे अतिशयच नाही का ? पैठण नगरीत हे मंदिर अखंडित आजही पहावयास मिळते.

मध्य युगातील सुप्रसिद्ध जैन चिमना पंडितची कथा अद्‌भूत आहे. प्रातःकाळची वेळ, गोदातीरचे रम्यस्थान, चिमना पंडित, एकनाथ महाराज व मौलाना हे तिघे मित्र नेहमीप्रमाणे तत्वचर्चा करीत बसलेले. तीनही भिन्न धर्मी असले तरी त्यांची अतूट मित्रता. एकनाथ महाराजांचा तो काळ परमसहिष्णु म्हणून त्यांचा बोलबाला. जिनभक्त चिमना पंडित यांची जिन धर्मावर जिन वचनावर निश्चळ श्रद्धा. मौलवीसाहेब मुसलमान धर्माचे कट्टर. परंतु तत्व चर्चे साठी ते कधी गोदातीरी येत आणि मनसोक्त धार्मिक चर्चा करीत.

अशाच एका अमावास्येला तिन्ही मित्र गोदातीरी चर्चा करीत असता एकनाथ महाराजांनी तिथीबद्दल चिमना पंडिताला प्रश्न केला. सहजपणे पंडिताचे तोंड आज पौर्णिमा असल्याचे बोलून गेले. दोघा मित्रांना आश्चर्य वाटले. एवढा जिन धर्म भक्त, सत्यवचनी पंडित आज अमावास्या असतांना पौर्णिमा असल्याचे म्हणतो. आश्चर्य वाटले. दोघांनी त्यांना पुन्हा विचारले पण एकवचनी पंडितची चूक लक्षात आली तरी निक्षून सांगितले आज पौर्णिमाच आहे.

घटना साधारण २००–३५० वर्षापूर्वीची आपण पौर्णिमा असल्याचे बोलून तर गेलो, पण जर आज शुभ्र चांदणे पडले नाही तर आपल्या धर्माची चेष्टा होईल. हे शल्य चिमना पंडितांना बोचू लागलं. काही झालं तरी आपण बोललेलं खरं झालंच पाहिजे. परंतु ती गोष्ट अशक्य कोटीतील आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती. तरीही त्यांचे आतलं मन त्यांना सांगत होतं आपण बोललेलं खरं

होईलच. फक्त आपण मूलनायक श्री. १००८ मुनिसुव्रत भगवंताची आराधना करावयास पाहिजे. त्यांचे शिवाय या संकटातून सुटका होणे अशक्यच आहे.

सकाळी नऊ चा सुमार. चिमना पंडित जिनमंदिर भुयारामध्ये भगवंताच्या प्रतिमेसमोर ध्यानस्थ बसून आराधना करीत आहे. भगवंताची स्तुती करीत आहे. संकट निवारण महामंत्र णमोकार मंत्राचं अखंड उच्चारण चालू आहे. वेळेचं भान नाही. दिवस केव्हा संपला नि रात्र केव्हा सुरू झाली याची त्यांना सुध नाही. एकच ध्यास . भगवंतांची आराधना. महामंत्र नमोकार मंत्राचा जप, आणि काय आश्चर्य! घडघडीत अमावास्येची रात्र असतांना टिपूर शुभ्र चांदणं पडलं आहे. चंद्राच्या शीतल प्रकाशात सारा परिसर न्हाऊन निघाला आहे. परिसरातील प्रत्येक जण एकमेकाकडे प्रश्नांकित नजरेने पहात आहे. आज अमावास्या असताना पिठासारखं स्वच्छ चांदणं पडलं होतं. केवढी ही सातिशयता ! केवढी ही धर्म प्रभावना !!!

वर्तमानकाळात शनि अमावास्येला व पौर्णिमेला या मंदिरातील भुयारामध्ये रात्री १२ च्या सुमारास आपोआप घंटानाद होतो व सुगंध धूर निघताना दिसतो. शनि अमावास्येला हजारोंच्या संख्येने यात्रेकरू भगवंताच्या दर्शनाकरिता येत असतात. पूजा आराधना करून मनोवांछित फळ प्राप्त करून घेतात.

या जीर्ण शीर्ण प्राचीन जिनालयाचा जीर्णोद्धार होणे अत्यावश्यक होते. तसा योगायोगही घडून आला. सन १९५८ मध्ये प. पू. तपोनिधी प्रातःस्मरणीय श्री. १०८ मुनि सुपार्श्वसागर महाराजांचे पैठण येथे क्षेत्राच्या दर्शनाकरिता आगमन झाले. जिनालयाची अवस्था पाहून पूज्य महाराजांचे मन व्यथित झाले. त्यांनी या जिनालयाचा जीर्णोद्धार करून जिनालयाचा संपूर्ण कायापालट करण्याचा संकल्प केला. त्यांना प.पू. श्री. १०८ मुनि आर्यनंदी महाराजांचा पूर्व काळ या भागात व्यतीत झालेला . अनेक त्यागी गणांनी व समाजातील प्रतिष्ठित दानवीर लोकांनी या कार्यात भाग घेतला. तनमनधनांनी साथ दिली. लाखो रुपयांचे दान जमा झाले. अल्पावधीत या जिनालयाचा जीर्णोद्धार झाला.

संगमरवरी चैत्यालय, विशाल महाद्वार, जयपूरकडील कुशल कारागिरांनी केलेले गगनचुंबी कलापूर्ण शिखर, तीर्थरक्षा कमेटीचे महामंत्री दानवीर सेठ हैद्राबाद निवासी यांनी आपल्या पूज्य मातोश्रींच्या प्रेरणेने बांधलेले उत्तुंग संगमरवरी

कलापूर्ण मानस्तंभ दर्शकाचे चित्त वेधून घेते. अनुभवी कुशल कारागिरांच्या मार्गदर्शकाचे निगराणीखाली संपूर्ण काम झाले असल्यामुळे न्यूनता कोठेही दिसून येत नाही. क्षेत्राचे दर्शन घेतल्यानंतर क्षणभर संसार पाशातून अगदी वेगळ्या ठिकाणी आल्यासारखे वाटते. इतके मनोज्ञ नि चित्ताकर्षक काम क्वचितच कोठे पहावयास मिळते. या अतिशय क्षेत्राचा संपूर्ण कायापालट सन १९६४ ला पंच-कल्याणिक महोत्सव अभूतपूर्व उत्साहाने साजरा झाला. लाखोंच्या संख्येने यात्रेकरूंनी या महोत्सवात भाग घेतला होता. प्रतिवर्षी चैत्र शु. १५ ला क्षेत्राचा वार्षिक यात्रा महोत्सव साजरा होतो. महाराष्ट्र व इतर प्रांतातून हजारोंच्या संख्येने भाविक लोक येऊन क्षेत्राचा वार्षिक यात्रा महोत्सव साजरा करतात. तीर्थ वंदनाचे महान पुण्य पदरात पाडून घेतात.

★

# अंतर्यामी

—श्री. पां. बा. भुतकर
२३।१६७५, अभ्युदयनगर, काळाचौकी,
मुंबई—४०० ०३३.

० साईबाबा कोठे आहेत ? असा प्रश्न बरेच लोक विचारतात. पण साईबाबा कोठे नाहीत ? असा प्रश्न विचारणारा क्वचितच एखादा. वास्तविक पहाता श्रींचा देह हा ज्या समाधीखाली आहे त्याच मंदिरात साईबाबा आहेत असे म्हणणे म्हणजे सर्वार्थाने चूक आहे. कारण —

माझा देह जरी इकडे ।
तुम्ही साता समुद्रा पलिकडे ।
तुम्ही काही करा तिकडे ।
जाणीव मज तात्काळ ।।

यावरून साईंची सर्वगामित्त्वाची खात्री पटते. मग समाधी हेच बाबांचे वसतीस्थान आहे हे म्हणणे चूकच आहे. याची खात्री पटते. देवांचा परमप्रिय बालभक्त

प्रल्हादाला त्याचे वडिल हिरण्यकश्यपूने विचारले, "तुझा परमेश्वर आहे तरी कुठे ?" त्यावर प्रल्हादाने दिलेले समर्पक उत्तर, "बाबा, देव नाही कुठे ? तो सर्व चराचर व्यापून उरला आहे. तो सजीवात आहे, तसाच निर्जीवात देखील आहे. सर्व लोक भरून तो उरला आहे." तद्वतच बाबा कोठे आहेत तेही ऐका --

कुठेही जा दुनियेवर ।
मी तो तुम्हांबरोबर ।
तुम्हा हृदयीच माझे घर ।
अंतर्यामी तुमचे मी ।।

साईबाबा हे प्रत्येकाच्या हृदयातच वास्तव्य करून आहेत. म्हणून फक्त साई–मंदिरातच साईबाबा आहेत असे नव्हे तर ते सर्व प्राणीमात्रात आहेत. ते नित्य तुम्हा आम्हांबरोबरच आहेत. मनुष्य पृथ्वीतलावर कोठेही असला तरी त्याचे हृदय हे नहमी त्याच्याबरोबरच असते. त्याप्रमाणेच साईबाबा हे ही तुमच्या-बरोबरच आहेत.

अशा तऱ्हेने साईबाबा हे सर्व प्राणीमात्रांमध्ये असल्यामुळे त्यांचे पूजन करणे सोपे आहे. त्यासाठी तुम्हास कोठे दूर जावयाचे कारण नाही. तुमच्या तसेच इतरांच्या हृदयात असणाऱ्या या साईबाबांना मनोमन नमन करा. सर्व भूत-मात्रावर प्रेम करा. त्यांची सुख-दुःखे समजाऊन घ्या. त्यांना शक्य ती मदत करा. हे केल्यास साईबाबा, आपणांवर आपोआपच प्रसन्न होतील. भुकेलेल्यास अन्न द्या, तहानेलेल्यास पाणी द्या. दुःखितांचे सांत्वन करा. शक्य तितके त्यांचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न करा.

ऐसा तुम्हा हृदयस्थ जो मी ।
तया.स नमा नित्य तुम्ही ।
भूतमात्रांच्याही अंतर्यामी ।
तोच तो मी वर्तंतो ।।

दीन दुबळ्यांचे दुःख जो जाणेल, मनोभावे दुःखपिडीतांची सेवा जो करेल, तोच खरा साईबाबांचा भक्त. दुःख दुसऱ्याचे जाणावे । त्यातील आपण वाटून घ्यावे' ही ज्याची मनोवृत्ती असेल तोच साईबाबांचा आवडता भक्त. जो तन मन धनाने साईचरणी विरून गेला आहे अशा निष्काम भक्ताकडून गोरगरिबांची सेवा घडेल. त्यागातच खरे सुख आहे. हे बहुतेक सर्व संतांचे बोल आहेत. अशा भक्तांवर संकट

आल्यास साईबाबा त्यांच्यामागे दीपस्तंभासारखे उभे राहून त्यांचे दुःख निवारण करतील. यात मुळीच शंका नाही. त्यासाठी श्रींच्या चरणी भाव मात्र पाहिजे.

तुम्ही कोणी कुठेही असा ।
भावे मजपुढे पसरिता पसा ।
मी तुमचिया भावासारिका ।
रात्रंदिन उभाच ॥

★

खरा विश्वमानव

# श्री बसवेश्वर

○ एके काळी मनुष्य म्हणजे अखिल जगताचा नागरिक ही कल्पना संस्कृतीचा बिंदू मानला जात होती. आजच्या अंतराळयुगाला मात्र 'विश्व मानव' ही कल्पना अधिक प्रिय वाटते. पण खरोखरच 'विश्व-मानव' आजचा आहे का ? तो तर वेद काळाइतका जुना आहे. आंग्लकवी कीटस् म्हणतो त्याप्रमाणे, ज्ञान ज्ञान म्हणजे काय ? तर जे आपण मुळात जाणतच होतो, त्याची केवळ स्मृती—— पुन्हा होणारी जाणीव !

विश्वमानव म्हणजे कोण ? आपल्या कल्पनेप्रमाणे अर्थातच असा मानव की, ज्याचं हृदय हे विश्वाइतकं विशाल आहे, ज्याच्या मनाची झेप एवढी उंच आहे की, ब्रम्हांडाचा पसारा त्याच्या एकाच नजरेत मावू शकतो. दैनंदिन आयुष्य जगताना प्रत्येक क्षणी त्याचा सूर त्या विश्वात्मकाशी जुळलेला असतो. पृथ्वीच्या पाठीवरचा कोणताही बिंदु त्याला स्वतःच्या घरासारखाच भासतो. मग तेथले हवा–पाणी आणि वातावरण कसेही असो त्याचा आत्मा हा सर्वज्ञानी असतो.

आत्म्याच्या या ज्ञानीपणात इतरही अनेक गोष्टी अंतर्भूत आहेत. असाच आत्मा इतर मानवांशी पशुपक्षांशी , वृक्षवेलींशी, एवढेच काय दगड-धोंड्याशी देखील एकरूप होऊ शकतो, समरस होऊ शकतो. खरा विश्वमानव तो की जो अखिल विश्वाशी एकतान, एकरूप, एकसूर झालेला आहे.

कर्नाटक भूमिला अतिशय अभिमान वाटावा अशी गोष्ट म्हणजे या भूमीनं बाराव्या शतकात अशा अेका विश्वमानवाला जन्म दिला, ज्याची दृष्टी दूरवर स्वच्छपणे पोहोचू शकत होती. मनुष्याच्या खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही, तऱ्हांच्या आयुष्यात त्याची ही ब्रम्हाशी अेकरूपता साधावी असा त्यांनी प्रयत्न केला. अल्लमप्रभू हे जर त्यांच्या काळातले "दैवी पुरुष" अवतारी असतील तर, श्री बसवेश्वर हे "विश्व-पुरुष" होते. त्यांचे अेकमेकाशी सख्य आणि सहकार्य हे कृष्णार्जुनांच्या सख्य आणि सहकार्याइतकंच अर्थपूर्ण आणि महत्त्वाचं होतं. या उत्तम पुरुषांच्या युतीनं आपल्या दैदीप्यमान प्रकाशानं आकाश आणि तसेच कर्नाटक भूमी व आसपासचा प्रदेश उजळून टाकला, तो काळ फार मोठा भाग्याचा होता.

बसवेश्वरांना त्या काळी प्रचलित असणाऱ्या नाथ पंथाचा फोलपणा कळलेला होता. अडाणी खेडुतांच्या मनांवर तर राक्षसी दैवतांचा व भूतखेतांच्या पूजेचा पगडा होता. अशा अडाणीपणावर व रुढीप्रियतेवर त्यांनी चढवलेला हल्ला अत्यंत कठोर बुद्धिवादाचाच होता. अध्यात्माला बुद्धिवादाची मौल्यवान जोड हवीच, असं म्हणण्यात ते आधुनिकांहूनही जास्त ज्वलंत होते. बाराव्या शतकात जगात इतरत्र असणारा अंधार पाहता त्यांच्या दूरदृष्टीची ताकद आपणाला तीव्रतेने जाणवते. प्रत्येक धर्म संस्थापकाला कुठल्या ना कुठल्या परंपरेचा, पीठाचा स्वीकार करावाच लागतो. त्याप्रमाणे बसवेश्वरांनी शैव पंथाचा काही बदल करून स्वीकार केला. आकाशाकडे नजर टाकण्यासाठी अंतराळातल्या कोठल्याही एका बिंदूवर स्थिर व्हावेच लागते ना? पण खरं महत्त्व असतं ते त्या दृष्टिक्षेपाला त्या नजरेला.

त्यांची बुद्धि कुशाग्र होती. तर हृदय सागरासारखे खोल अथांग. त्यांच्याकडे चोरी करावयास आलेले दरोडेखोर विनम्र होऊन, त्यांच्या उदारपणाला दिपून, त्यांच्या पायावर पडले, त्यांनी बसवेश्वरांचं शिष्यत्वच पत्करलं. कारण ते चोर गायी घेऊन चालले असतांना बसवेश्वरांनी उरलेल्या वासरांना सोडून त्यांच्याकडे पाठवलं. अेकदा अेका चोराने त्यांच्या पत्नीची कर्णकुंडले नेण्याचा प्रयत्न केला. त्यावर ते उद्गारले, "मी एक चोरच, पण आता माझ्या घरात सवाई चोर घुसलेला दिसतो.! तो प्रभुच होय ! आणखी कोण असणार ?" प्रत्येक इतर भक्तालाही त्यांनी देवरूपच मानले. आपल्या दैवताच्या दर्शनासाठी त्यांचं हृदय व्याकुळलं होतं. त्यांची भक्ति अतुलनीय होती. राजा बिज्जलाचा अर्थमंत्री म्हणून आपले कर्तव्य चोख बजावीत होते. पण भक्तिचं भांडार मात्र सारं त्यांनी संगमदेवाच्या चरणी वाहिले होते.

त्यांचं आयुष्य निर्भय, द्वेषरहित स्वर्गीय होते. जातिजमातीच्या भिंतींनी दुभंगलेल्या, खंडित झालेल्या समाजाकडे ते मुक्तिदूत होऊन आले, एकतेचा आणि समतेचा संदेश घेऊन ब्राम्हण आणि शुद्र, सेवक आणि राजकुमार, सारे समान आहेत. असं सांगत ! देवाच्या दृष्टीनं सारे सारखेच नव्हते का ! फरक असला तर तो फक्त देवापासून आपण किती - किती अंतरावर आहोत, एवढाच ! मोठेपणा हा जन्माच्या अपघातावर थोडाच अवलंबून होता ? मानवी समाज म्हणजे काय ? तर आत्म्यांचे प्रजासत्ताक, आत्म्यांची लोकशाहीच, असा विचार करून ते प्रत्येकाबद्दल तेवढाच प्रेमादर मनात बाळगीत. त्याचं आंतरिक ज्ञान म्हणजे सगळे दोष दूर करणारा सूर्यप्रकाशांचा झोतच जणु. त्यांच्यातला आंतरिक आणि बाह्य मनुष्य एकच होता. ज्यांच्यात ही आंतरिक व बाह्य पूर्णत्वाला पोहोचलेली असते, असेच लोक विश्वमानव या संज्ञेप्रत जाऊ शकतात. त्यांचं हृदय मन आणि इच्छाशक्ती ही सारी अेकाच ताऱ्याकडे वाटचाल करीत असतात.

खरे सांगायचे तर विश्वमानव हा नव्या मानवाचा शुभ वर्तमान घेऊन येणारा दूत, नव्या मनुष्य वंशाचं भविष्य वर्तवणारा द्रष्टा. विश्वामित्र आणि वशिष्ठ, महावीर आणि बुद्ध, ख्रिस्त आणि झरतुष्ट, झळकणाऱ्या ताऱ्यांच्या या आकाशगंगेतच पुढे बसवेश्वराचे नाव येते. ते बाराव्या शतकातले असोत. पण त्यांची आधुनिकता अशी आहे की, ती शिकवण आजच्या आणि येणाऱ्या काळाला लागू पडेल. त्यांची शिकवण अेकताच, तिला प्रतिसादाचा हुंकार एकाद्या रशियन वा अमेरिकन, मेक्सिकन वा अिजिप्शियन याही हृदयातून उमटेल. ती सर्वांनाच कळणारी आणि सर्वांसाठी असणारी आहे. विश्वात्मकता म्हणजे काय ? तर जमिनीवरच्या भेदाना दूर करून मुळाशी अेक असणाऱ्या माणसाच्या माणूसपणाची त्याच्या मूळ अेकतेची त्याला जाणीव करून देणे. मनुष्य जात ही वर्षानुवर्षे माणूसपण विसरत आहे, वरवरच्या फांद्यांच्या जाळ्यातून मर्कटलीला करीत उड्या मारते आहे. ! युगानुयुगे हेच चालले आहे. पण तो शुभ दिवसही कधीतरी उजाडेल. त्याबद्दल घेऊन येणाऱ्या नव्या पहाटेसाठीच आमचा विश्वमानव जगला आणि संपला. त्याचं जगणं आणि मृत्यू ही दोन्ही विफल, व्यर्थ झालेली नाहीत.

कल्याण स्थानी बसवेश्वरांनी जे 'अनुभव-पीठ' स्थापन केले. त्याहून श्रेष्ठ पीठ क्वचितच कुठे असेल. इथे अल्लम प्रभूंच्या मार्गदर्शनाखाली, आणि बसवेश्वरांच्या नेते पदासाठी अनेक तत्ववेत्ते, तत्त्वज्ञानी, संत आणि द्रष्टे जमले. स्वतःला व अेकमेकांना जोखण्यासाठी अेकमेकांची परीक्षा, प्रतिपरीक्षा घेऊन अप्रामाणिकपणाचा पूर्ण नायनाट करण्यासाठी, त्यातून शुद्ध होऊन अेक अखेरचे

पूर्ण अंतिमतत्व दैवत–प्रतिक लिंग, त्याचा वेध घेण्यासाठी, सर्वांची अंतर्मने त्या स्वर्गीय ज्वालेने प्रकाशित व्हावीत म्हणून, अनादिअनंत अशा यात्रेचे सहप्रवाशी म्हणून अेकमेकांना सोबत करण्यासाठी, शुद्धतेच्या मैत्रिकाची जपणूक करण्यासाठी आणि येणाऱ्या मानवांच्या हवाली, त्यांच्या या प्रवासाची, या आत्मशोधाच्या प्रयत्नांची लढाईची, देवदर्शनाच्या ब्रह्मानंदाची, आणि अेकतेवर आधारलेल्या नव्या समाजरचनेची, शुद्ध झालेल्या, मुक्त झालेल्या अशा नव्या माणसाच्या स्वप्नांची ही सारी शिदोरी सोपवण्यासाठी ख्रिस्ताचे प्रतीक पांढऱ्या शुभ्र शेळीचे आहे, तसे बसवेश्वर म्हणजे जणू संरक्षणकर्ता, माता नंदीच, जो शिवपार्वतीना आपल्या पाठीवर घेऊन पृथ्वीवर उतरला! आत्मज्ञानाच्या शोधकांना वाटे की, कल्याणभूमी म्हणजे सुवर्णजडित रस्त्यांचे वैभवशाली कैलासच, त्यात आश्चर्य ते काय ?

श्री बसवेश्वर विश्वमानव होते, म्हणूनच साऱ्या माणसांना कळेल, आवडेल, त्यांच्या हृदयाला स्पर्श करील, असा साहित्यप्रकार त्यांनी आपल्या उपदेशातून रूढ केला. त्यांची वचनें, छोटी छोटी गद्यकाव्ये रूढ असलेल्या बोलीभाषेतून त्यातले शब्दप्रयोग घेतले आहेत. त्यांचा ताल हा ओळीपुरताच, छंदोबद्ध नसणारा, पण मोठा जीवंतपणे जाणवणारा आहे. विरूद्ध अर्थाचे शब्द योजून वाढवलेली अर्थपूर्णता, पुनरूक्तीने साधलेली परिणामकारकता, ही त्या गद्यकाव्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्या वचनांना त्यांनी भक्तिभावनेचा ज्वलंतपणा दिला. असामान्य यौगिक आध्यात्मिक अनुभवांचा प्रकाश दिला, अखंड चिंतनाने होणारा, प्राप्त ज्ञानाचा वेगवान वेध दिला. साहित्य प्रांतातही त्यांनी रूढ छंदोबद्ध, नियमबद्ध काव्याविरुद्ध बंडाचा झेंडाच उभारला, आणि त्याच्यानंतर अनेकांनी हा काव्यप्रकार यत्नपूर्वक आपलासा केला. ही वचने म्हणावी तर अडाण्यांनाही कळतील अशा सोप्या भाषेत होती. पण त्यातली अर्थगर्भता ही पंडितांनाही वाहवा म्हणावीशी होती. याचे कारण हे की, वचनें ही सखोल चिंतनातून, आध्यात्मिक अनुभवांतून, आणि खऱ्याखुऱ्या ईश्वर साक्षात्कारांतून निर्माण झालेली आहेत. त्यांच्यातला अनुभव पहिला महत्त्वाचा आहे.

कर्नाटक भूमीच्या इतिहासात तो काळ मोठाच महत्त्वाचा होता. सामाजिक उलथापालथ ही अपरिहार्य अटळ जवळ आलीशी भासत होती. मोठी धुरा खांद्यावर घेणारी द्रष्टी माणसेही समाजात होती. मोठ्यातली मोठी थोडी सांगायची म्हटली तरी अल्लमप्रभू, बसवेश्वर, चन्नबसवेश्वर, अक्कमहादेवी, या चौघांच्याही

अंगी मोठा सामाजिक बदल यशस्वीपणे घडविण्याची ताकद होती. पण अजून काळ तेवढा योग्य नव्हता हेच खरे. जातिविरहित समाजव्यवस्था म्हणजे लोकविलक्षण भ्रामक कल्पना वाटण्याचे ते दिवस होते. जुन्या मताच्या ब्राम्हण आणि जैनांनी धर्म धोक्यात आल्याचा गदारोळ उठवला. राजा इकडे तिकडे पहात कुंपणावर बसून राहिला. अर्थमंत्री आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत, अशा ओरडयाचा सुद्धा प्रयोग झाला. पण राजाला हे आरोप बिनबुडाचे असल्याची खात्री होती. त्या दोषारोपांचे जाहीर निराकरण केले गेले. अखेरच्या थराला गोष्टी गेल्या. त्या लडिवाळासारख्या शिष्यांच्या उत्साही क्रियाशील अनुकरणातून मधुवारस या ब्राम्हणाने आपली कन्या माचय्या हिचा हरळय्याच्या मुलाशी विवाह करून दिला. हरळय्या या तथाकथित 'शूद्रां'पैकी. या विवाहाचे बसवेश्वराच्या सर्व शिष्यगणांनी समारंभपूर्वक स्वागत केले. मधुवारस आणि हरळय्या दोघेही बसवेश्वराचे शिष्यच होते. कल्याणांतल्या पुराणमत वाद्यांनी या विवाहाविरुद्ध राजाकडे तक्रार नेली, व न्याय केला जावा, गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे अशी मागणी केली. बसवेश्वरांनी विवाहाचे समर्थन करून बिज्जलाला, पुराणमतवाद्यांच्या आरोपांचे व्यर्थपण पटवून दिले. शिक्षा न करण्याचा सल्ला दिला. पण राजा बिज्जल आपल्या सल्ल्याकडे काणाडोळा करतो आहे. असे पाहिल्यावर बसवेश्वरांनी कल्याण सोडण्याचाच निर्णय घेतला, व ते बागलकोट जवळ कप्पडिसंगम येथे जाऊन राहिले.

विश्वमानवाने स्वत:मध्ये सारे विश्वच सामावून घेतले होते. त्यांनी जातिविरहित समाजाची कल्पना प्रत्यक्षात आणणारा पंथ स्थापिला, आणि तत्कालीन द्रष्टया संत पुरुषांना आकर्षित करून घेतले. त्या संत सज्जनांना या समाजकल्पनेचे अतुलनीय मूल्य आणि महत्त्व कळले होते. पण अेकीकडे अंधश्रद्धांचा पगडा फार बळकट होता. वेळ अजून पुरेशी परिपक्व झालेली नव्हती. क्रांतिचा क्षण अजून आला नव्हताच. म्हणून च ते ज्या चैतन्य निर्झराकडून आले होते. त्याकडे पुन्हा परत गेले. हा शोध , हा प्रयत्न मात्र चालू रहायचा होता.

मात्र कर्नाटकभूमीच्या आणि जगाच्या भाग्याचीच ही गोष्ट की, बसवेश्वरांनी आपल्या जीवंत काव्याचं भांडार आपल्यामागे ठेवले. काव्याने विश्वमानवाची कल्पना जपली आहे, जोपर्यंत ती प्रत्यक्षात अवतरली नाही, तोवर ती त्या काव्यात अमर होऊन राहील.

" अरे या संत सज्जनांना हलके लेखू नका " बसवेश्वर एके ठिकाणी म्हणतात. "आपल्या गालांना गुदगुल्या करण्यासाठी कोणी नागफण्याचा उपयोग करील काय?

आपल्याच केसांचा गुंता सोडविण्यासाठी काय कुणी मशालीची मदत घेईल काय? वाघाच्या मिशा धरून कोणी झोके घेण्याची इच्छा धरील काय ?"

"जगाला सुधारण्याची चिंता तुमच्या डोक्यावर कशाला" ते म्हणतात "स्वतःला सुधारा, स्वतःच्या शरीराकडे लक्ष द्या. स्वतःच्या मनाकडे लक्ष द्या." त्यांची अखेरची प्रार्थना होती, "तू दिलेली आज्ञा मी पार पाडली. आता मला तुझ्या हृदयात जागा दे. हे कुंडलसंगम देवा.!" देह धारण करून पृथ्वीवर आलेल्या महान आत्म्याची सदा सर्वकाळी हीच प्रार्थना असते, नाही का ?


## श्रीसाईबाबा पंचषष्ठि महानिर्वाण विशेषांक

• संतचूडामणि भगवान श्रीसाईबाबांच्या महानिर्वाणाला यंदाच्या विजयादशमीला ६५ वर्षे पूर्ण होतात. या निमित्ताने श्रीसाईलीला आक्टोबर १९८३ चा अंक श्रीसाईबाबा पंचषष्ठि महानिर्वाण विशेषांक म्हणून प्रकाशित करीत आहे.

या विशेषांकाला शोभेल असाच गद्य—पद्य मजकूर १५ जुलै १९८३ पर्यंत पाठविल्यास त्याचे स्वागतच होईल. भक्तांनी या खास अंकासाठी अनुभव लेख अजिबात पाठवू नयेत.

बघताच हृदयाशी धराल असे श्रीबाबांचे अत्याकर्षक मुखपृष्ठ.

पृष्ठे ६४) (किंमत १ रुपया

# गणदेवीची जानकी देवी

—डॉ. अ. का. पाठक
पाठकवाडी,
गोरेगाव, मुंबई (पश्चिम)

गणदेवीच्या जानकीदेवी आपल्या भक्ताना उदबत्तीच्या धुरात शिरडीचे दर्शन देत असत. भक्त धूराकडे पहात असताना त्यांना प्रथम शिरडी दिसे. मग श्री साईनाथ दिसू लागत. श्री साईबाबांचे दर्शन झाल्यावर भक्त आनंदाने साईरामांना नमस्कार करीत.



बिलीमोऱ्या जवळच्या पश्चिम रेल्वेमार्गावरील गणदेवीची दुर्गाई जानकीने श्री साईरामप्रमाणे गावात महामारीचा रोग आला आहे हे पहाताक्षणी गणदेवी—सभोवती पिठाची रेषा मारली व पटकीमहामारीचा बंदोबस्त केला. भक्तांनी गंगेच्या दर्शनाची इच्छा व्यक्त केली. जानकीदेवीने अंगणात गंगा आणली अंगणात गंगेचे जल वाहू लागले. सर्वांनी पवित्र जलाचे प्राशन केले. मग श्री गंगा काहीकाळ देव-घरातील जमिनीखाली वाहती ठेवली होती. गणूमहाराजांना असाच चमत्कार श्री साईबाबांनी दाखविला होता. श्री साईंच्या पायाच्या अंगठ्यातून गंगा—यमुना—सरस्वतीचे जल उत्पन्न होऊन वाहू लागले होते. प. पू. गणू महाराज बाबांचे परमभक्त झाले व त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले.

श्रीरामस्वरूप साईंचा देहत्याग दसऱ्यास झाला गणदेवीच्या जानकीदेवी रामनवमीस कैलासवासी झाल्या. श्रीरामाचा जन्म शु. १२ ला झाला. राम-

नवमीस मध्यान्हीला जानकीदेवीने देहत्याग केला. श्रीराम नवमीच्या उत्सवाचे कौतुक शेगावच्या गजानन महाराजांना फार होते. शेगावात रामनवमी उत्सवाचा सोहळा होतो. शिरडीस श्री साईनाथांनी रामनवमी उत्सवाची परवानगी दिली. शेगाव–शिरडीच्या रामनवमी उत्सवाचा अनुभव प्रत्यक्ष घ्यावा व कृतकृत्य व्हावे. श्रीरामनवमीस दु. १२ वाजता, ३५ वर्षापूर्वी, जानकीदेवीनी देहत्याग केला.

शिरडीच्या लेंडीबागेतील श्री साईनाथांच्या स्नान समयीच्या योगिक क्रिया गणदेवीत जानकीदेवी उदबत्तीच्या धुरामध्ये भक्तांना दाखवित असत. श्री साईबाबांचे अस्तित्व शिरडीत असताना जानकीदेवी गणदेवीत होत्या. श्रीसाईंच्या देह त्यागानंतर अंदाजे ३० वर्षानंतर जानकीदेवीनी आपला देह सोडला. संत तुकारामासाठी वैकुंठाहून विमान आले होते. संत जलाराम बाबांसाठी स्वर्गीय रथ आला होता. जानकीदेवींच्या कैलास गमनासाठी इंद्राचा ऐरावत आला होता, असे त्यांचे निस्सिम भक्त सांगतात.

नवरात्राचे महत्त्व श्रीसाईंना होते. श्री दुर्गामातेच्या प्रत्यक्ष अवतार स्वरूप जानकीदेवी होत्या. शेगावात गजानन महाराज होते. ते 'गण गण गणात बोते' ह्या मंत्राचा जप करीत असत, व त्याचकाळात गणदेवीत जानकीदेवींचे लीलानाट्य चालू होते. हा योगायोग आहे की अध्यात्मिक संबंधाचे दर्शक आहे, हे महान अध्यात्मिक जाणकारच सांगू शकतील.

गोठ्याला आग लागली. गावाने प्रयत्न केले तर विफल झाले. जानकीदेवीस शरण गेले. जानकीदेवीने क्षणात चमत्कार घडवून आगीचे शमन केले. आता ही गणदेवी कोठे आहे हा वाचकांना प्रश्न पडेल. प्रिय वाचकांनो ही गणदेवी गुजरातेत बिलीमोऱ्याजवळ आहे. गणदेवी जवळच्या नदीस पूर आला. गावात पाणी शिरले. बेंगणीया नदीचा पूर केवळ सात पावले चालून सातवेळा तीर्थ शिंपडल्यावर रोखला गेला. मग जानकीदेवीने नदीस मर्यादा घालून दिली. पुढे कधीही नदीला पूर आला नाहीं. नदीकिनारी शिरडी तर गणदेवीही नदीच्या किनारी आहे. संत, महात्मे, अवतारी विभूति नदीच्या किनारी असलेल्या गावी वास्तव्य करतात. गणदेवी ही रजपूतांची ऐतिहासिक काळात रणभूमि होती. ह्या गणदेवीत जानकीदेवीने अंदाजे ५० वर्षे वास्तव्य केले व मग मृत्युलोकाचा त्याग केला.

श्रीसाईंनी भक्तांना त्यांच्या इच्छेप्रमाणे विठोबाचे दर्शन घडविले आहे. भक्तांच्या इच्छा पूर्ण केल्या. जानकीदेवीने भक्तांच्या मनीषेसाठी विठाई–दुर्गाईचे दर्शन गणदेवीत घडविले आहे. भक्तासाठी घडलेल्या श्री साईंचे आशीर्वाद स्वरूप चमत्कार व जानकीदेवींच्या चमत्कारात साम्य दिसून येते. ह्या चम-त्कारांचे साम्य-स्वरूप पाहिल्यावर मनास समाधान वाटते. पण लेखणी तोकडी पडते.

आज गणदेवीच्या जानकीदेवींचे अस्तित्व 'बा' स्वरूपात बडोद्यात आहे. संतांचा ठावठिकाणा सहजसाध्य नसतो तो अध्यात्मिक योगायोगाने घडतो. अवतार स्वरूप व्यक्तींचे कार्य एकमेकास पूरक असते. त्याचे एकमेकाशी बिन तारी तारायंत्राप्रमाणे अध्यात्मिक संबंध असतात. अमर आत्मा संबंधात हा पामर लेखक काहीही भाष्य करू शकण्यास असमर्थ आहे. असामान्याचे सामान्याने वर्णन करणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास घेणे आहे. त्याना नतमस्तक होऊन साष्टांग दंडवत घालणे हेच आपले कर्तव्य आहे.

गजेंद्रमोक्ष समयी गजराजाच्या सहायार्थ श्री विष्णू धावले. महिषासूराच्या मदोन्मत्त वागणकीमुळे त्रस्त जनतेस सोडविण्यासाठी दुर्गाने रणकंदन करून जनतेचे रक्षण केले. त्रस्त जनतेचे तारण करण्या प्रित्यर्थ गणदेवीत जानकी-देवीने वास्तव्य केले होते. आपल्या कार्यपूर्तीनंतर त्या कैलासास परतल्या. शिरडीत श्री साईरामांनी भक्तांसाठी देह झिजविला. आजही श्रीसाई भक्तांच्या सहाय्यार्थ धाव घेतात. जानकीदेवींचे भक्तांना अशीच प्रचिती येत आहे. आपल्या भक्तांना जानकीदेवीने सदैव शिरडीमहात्म्याचे महत्त्व सांगितले होते. श्री साई-महिमा सर्वश्रुत आहे. जानकीमाई महिमा किंचित कथन केला आहे.

# द्वारकामाई

–श्रीमती मथुराबाई हिबारे.
द्वारा डॉ. युवराज हिबारे.
सिंगारबाग बीदर, घर. नं. १–८–२५,
पो. जि. बिदर (कर्नाटक) पीन को. नं. ५८५४०१

**मोठी कृपाळू ही मशीदमाई । भोळ्या भाविकांची ही आई ।**
**कोणी कसा ही पडो अपायी । करील ही ठायीच रक्षण ।।**

साईबाबांच्या म्हणण्याप्रमाणे खरोखर ही द्वारकामाई आपल्या दारी येणाऱ्या भक्तांना समाधान मिळवून देते. ज्याप्रमाणे आई मुलाची काळजी करते व त्यांना सुख व्हावे म्हणून धडपडते तद्वत् ही मशीदमाई साऱ्यांना काळजीतून मुक्त करते, व त्याना समाधान लाभवून देते. द्वारकामाईत गेलेला माणूस थोडावेळ तरी तेथे रमतो त्यांना सुख मिळते. कित्येक भक्त तर बाबांची खरी भक्ती येथे बसून करतात. जणू भक्तांना येथे बसून भक्तीग्रंथ वाचण्यात, स्तोत्रे म्हणण्यात, जप आदि करण्यास प्रोत्साहन मिळते. येथे माणसाचे मन अगदी शांत बनते. थोडावेळ तरी ह्या संसाराला विसरून बाबांत सारे रमतात. त्यात जेवढे सुख नि आत्मशांति लाभते ती दुसरीकडे कुठेही मिळत नाहीं.

पाच वर्षात आम्ही कमीत कमी ६–७ वेळा तरी शिरडीस गेलो. अर्थात् द्वारकामाईत ही पुष्कळवेळा जाण्याचा प्रसंग आला. बाबांचे दोन मोठाले फोटो तिथे आहेत. त्यांना मनोभावे नमस्कार करणे उदी लावणे व थोडी तोंडात टाकणे अन् पाणी पिणे आदि पुष्कळवेळा केले. पण जेव्हां जा तेव्हां एक नवीन अनुभव पहावयास मिळतो, व मनाला शांतता लाभल्याशिवाय रहात नाहीं. पण एके दिवशी अशी एक चमत्कारिक घटना घडली तेव्हां पासून द्वारकामाई-तील त्या बाबांच्या चित्रामुळे बाबांवर माझी श्रद्धा दृढ बनली आहे. ते माझे माता पिता सर्व काही आहेत असे वाटू लागले आहे. ह्या अगोदर असे कधी घडले नव्हते.

एके दिवशी मी व माझे पती माझी दोन मुले संध्याकाळच्या आरतीला जावे म्हणून तयार होत होतो. मुले अगोदर तयार होऊन बाहेर खेळता खेळता

हुमरीतुमरी वर येऊन रडारड करू लागली. अशावेळी हे रागावून मोठ्या मुलास त्यांनी एक चापट मारली. तेव्हां तो रूसून जो खाली पळाला तो कुठेच दिसेना. ऐन आरतीच्या वेळी मुलगा नाही याची रूखरूख आम्हां दोघाना लागली. आरती आटोपताच बाबांचे दर्शन घेऊन तेथेच थोडावेळ आम्ही थांबलो पण मन इतके काहीं अशांत बनले की समाधी मंदिरात काहीं केल्या ठरेना व पाऊले आपोआपच द्वारकामाईकडे वळली. मी अन् हे व धाकटा मुलगा द्वारका-माईत गेल्यावर बाहेरच्या बाजूला बाबा बसत होते त्या दगडावर जे बाबांचे मोठे चित्र आहे त्याला नमस्कार करून पुढे पायऱ्या चढून धूनी समोरील बाबांच्या चित्राजवळ मी आले तोच बाबांचे ते चित्र मला हसरे वाटले व मी बाबांकडे इतकी काहीं आकर्षित झाले की पूर्वी कधी मी त्यांना याप्रमाणे हसताना पाहिले नव्हते. ते पहाताना माझे भान हरपले. मी ध्यानस्थ झाले व मनाला अशी काही शांती लाभली की मुलगा जवळ नाहीं रुसून गेला आहे, याचेहि भान राहिले नाहीं. बाबांनीच जणू माझ्या अशांत मनाची अस्थिरता घालवून 'श्रद्धा अन् सबुरीचा' पाठ शिकविला. कारण बाबांच्या दरबारी बाबा लहान थोरांची काळजी घेतात हे मी विसरले होते.

द्वारकामाईतच आमचा मुलगा आम्हांला मिळाला व म्हणाला "आई मी खोलीच्या खालच्या बाजूलाच होतो. तुम्ही मला पाहूनही पुढे तसेच निघून आलात. तरी तुम्ही द्वारकामाईतच असाल म्हणून मी पण इथेच आलो.' हे ऐकून मला आनंद तर झालाच पण बाबांच्या झालेल्या साक्षात्कारानं तो द्वि-गुणीत झाला. अशा महान संताचे किती म्हणून वर्णन करावे अन् ते करणे तरी माझ्या सारख्या अज्ञानी बाईला जमेल काय? अशा या समर्थ साईबाबांना माझे कोटी कोटी प्रणाम!

जय साईनाथ

★

# जेथे श्रद्धा तेथे साई

—सौ. प्रेमला शंकरराव मैराळ
'हेरंब', मैराळवाडी, बडोदे.

० गेल्या वर्षी दसऱ्याचे दिवशी श्रीसाईबाबांचे पुण्यतिथी निमित्त आमच्या "साई मंडळाने" सत्यनारायण व महाप्रसाद असा कार्यक्रम ठेवला होता. त्या दिवशी श्रीसाईबाबांनी आपलेकडे कोणाच्या तरी रूपाने यावे, अशी माझी अंतःकरण पूर्वक इच्छा होती, व त्यासाठी मी अगोदर दोन तीन दिवस एकसारखी प्रार्थना करीत होते.

आदले दिवशी पासूनच सर्वजण आनंदाने व उत्साहाने तयारीस लागले होते. त्या दिवशी १० वा. पासूनच सत्यनारायणाच्या पूजेस सुरुवात झाली. माझे लक्ष मात्र बाहेरून कुणी तरी तिऱ्हाईत व्यक्ति अवचित यावी व निदान आपण त्यांनाच "श्रीसाईबाबा" आले असे समजून आनंद मानू, इकडे लागले होते. अकरा वाजले तरी कोणीही येण्याचे चिन्ह दिसेना तेव्हां मात्र मी निराश झाले होते.

इतक्यात आमचे जवळ रहाणारे एक परम साईभक्त व पूज्य श्री शांतवनजी महाराजांचे पट्ट शिष्य श्री. नरहरी भट ह्यांचेकडून प. पू. श्री. शांतवनजी त्यांचेकडे अचानक आले आहेत तरी दर्शनास यावे असा निरोप आला. ते फक्त एक तासच थांबणार आहेत.

घरात सर्व गडबड आरती प्रसाद वगैरेची वेळ झाल्याने मला इच्छा असून जाणे शक्य नव्हते. म्हणून मला वाईट वाटले. परंतू माझे पती श्री. शंकरराव म्हणाले, मी तरी उभ्या उभ्या दर्शनास जाऊन येतो, व जमल्यास त्यांना आपले घरी त्यांचे पाय लागावे म्हणून विनंती करून पहातो. त्याप्रमाणे त्यांनी जाऊन विनंति करताच पू. शांतवनजी लगेच तयार झाले. व तुम्ही पुढे व्हा, हा मी तुमचे मागोमाग आलोच.

ह्यांनी हा निरोप घरी येऊन सांगताच सर्व 'साईसेवा मंडळाला' अत्यानंद झाला. इकडे आमची पूजा वगैरे संपली. पोथीही संपली. नंतर आरतीसाठी

आम्ही पू. महाराजांची वाट पहात होतो. अर्धा तास वाट पाहून नंतर आरतीस सुरूवात केली. सर्व लोक आरतीसाठी उभे राहिले व मी आपल्या बाबांची आवडती आरती "आरती साईबाबा" ही म्हणावयास सुरवात केली. तोच मागे दारात पू. श्री. शांतवनजी व त्यांचे प्रियशिष्य श्री. नरहरी भट वगैरे येऊन उभे. सर्वांनाच आनंद झाला. आम्ही आरती तशीच चालू ठेवली होती. महाराज पण अत्यंत भाविकपणे हात जोडून उभे होते. आरती व मंत्रपुष्प झाल्यावर पू. शांतवनजींनी श्री साईबाबा पुढे साष्टांग नमस्कार घातला व काही वेळ डोळे मिटून ते स्तब्ध उभे राहिले नंतर सर्वांनी त्यांना आसनावर बसवून फूल हार वगैरे करून दर्शन घेतले.

मला मात्र खात्रीच झाली की, मी मनात प्रबळ इच्छा केली होती त्या-प्रमाणे "श्री बाबांनीच" अवचित येऊन दर्शन दिले आहे. त्यांच्या चरणावर डोके ठेवल्यावर मला किती आनंद झाला ते मी लिहू शकत नाही. माझ्या आनंद अश्रूंनी त्यांचे चरण धुतले गेले तोंडाने काहीच बोलू शकले नाहीं. माझ्या पतीनींही त्यांचे चरणावर डोके ठेवले. त्यावेळी त्यांचेही डोळे प्रेमाश्रूंनी भरून आले, व आमची पर्णकुटी पावन केली त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत ऋणी आहोत असे पू. शांतवनजींना हे म्हणाले तेव्हां पू. शांतवनजींनी त्यांच्या मस्तका-वर आपला वरदहस्त ठेवला. नंतर तीर्थ प्रसाद वगैरे कार्यक्रम झाल्यावर पू. शांतवनजी परत निघाले. दाराशी त्यांचेसाठी गाडी उभीच होती. त्यांना लगेच कर्नाळीस जावयाचे होते. आमचे जवळच असलेल्या आमच्या श्री गणपती मंदिरात पू. शांतवनजी दर्शनास गेले. त्यांचे बरोबर आम्ही सर्व होतोच. महत्वाची गोष्ट म्हणजे मंदिराच्या पायऱ्या उतरून ते क्षणभर थांबले. त्यांचे मागोमाग मी उतरत होते. मी त्यांच्या जवळ जाई पर्यंत ते तेथेच थांबले. व मग माझेकडे वळून म्हणाले

'वेळेवर आलो ना?'

हे ऐकल्यावर मला एक साक्षात्कार झाला असे वाटले. मी तीन दिवसापासून 'श्रीबाबांनी' उत्सवास यावे म्हणून प्रार्थना करीत होते ती माझी इच्छा श्री साईनाथांनी पूर्ण केली होती. मी त्यांना काही उत्तर देऊ शकले नाहीं. फक्त पुन्हां पायावर डोके ठेवले. त्यांच्या आगमनानं सर्वांनाच परम आनंद झाला होता. 'वेळवर आलो ना?' ह्या त्यांच्या शब्दांनी सर्वांना आश्चर्य वाटले. कारण मी बाबांना बोलाविले आहे, व ते कोणाही व्यक्तिच्या रूपाने जरूर

येतील असे मी अगोदर पासून सर्वांना सांगत होते. त्याप्रमाण 'श्री साईबाबांनी' येऊन सर्वांना दर्शन दिले. अशी सर्वांची खात्री होऊन सर्वांनी तो दिवस मोठ्या समाधानात घालविला.

माझा असाच दुसरा एक अनुभव माझ्या एका नातीचे लग्न एका नामवंत घराण्यातील सुशिक्षित मुलाबरोबर ठरले होते. मुलगा व मुलगी दोघ नोकरी करीत असल्यान त्यांचे प्रेम जमले होते. नंतर वडील मंडळींना हे पसंत पडल्यान त्यांनी हे लग्न निश्चित केले, व दोन महिन्यानंतरची लग्न तिथी नक्की केली. परंतु मुलाचे वडीलांची "फॅक्टरी" व एक 'वुलन मिल' असल्याने नेहमी नेहमी एक सारख्या काहींना काही कामाच्या अडचणी निघत व त्यामुळे लग्नाची तारीख नक्की ठरवूनही वारंवार पुढ पुढ ढकलली जाई. असे होता होता वर्ष दीड वर्ष पुढं गेले. मुलाच्या वडलांच्या मते सर्व कामकाज स्थिर होई पर्यंत थांबावे असे होते त्यामुळे मुलीकडील मंडळींना काळजी वाटू लागली. लग्नाची मुलगी व मुलगा ह्यांचा तर फारच विरस झाला. शेवटी ती दोघे कंटाळून रजिस्टर पद्धतीन लग्न करण्यास तयार झाली. ती मुलगी "श्रीसाईबाबांची" परम भक्त असल्या कारणान ती श्री साईबाबांना रागान प्रेमाने खूप चिडून बोलली. मलाही खूप वाईट वाटले. मी श्रीबाबांना कळकळीने प्रार्थना केली व ह्यातून लवकर चांगला मार्ग काढा म्हणून विनविले, व चमत्कार असा झाला की आम्ही रात्री बाबांपाशी हे सर्व म्हटले व सकाळी उठल्याबरोबर दोन्ही पक्षांकडील वडील मंडळींना अशी एकदम प्रेरणा झाली की सर्वांनी एकत्र जमून काहीही करून जवळची तिथी निश्चित करावी. त्याप्रमाणे सर्वजण एकत्र येऊन त्या दिवसापासून आठव्याच दिवशी तिथी निश्चित ठरली व लग्न समारंभ मोठ्या आनंदाने व उत्साहाने पार पडला. मुलीच्या एका साईभक्त आत्याने लग्नाचे वेळी मंगलअक्षता उधळतांना त्यात श्रीबाबांची उदी मिसळावी असे सुचविले व तसे केल्याने वधू–वरांना 'श्रीसाईबाबांचे' प्रेमळ शुभआशिर्वाद सहजच मिळाले. सर्वत्र आनंदी आनंद झाला. असे आहेत हे आपले 'बाबा'.

☆

# १ चमत्काराशिवाय नमस्कार नाही
# २ नास्तिकाचा साईभक्त झाले !

—श्री. सुरेश दत्तात्रय कुलकर्णी.
द्वारा द. ना. सिरूर बालकाश्रम,
४०, प्रार्थना समाज रस्ता, विलेपार्ले (पूर्व).
मुंबई—४०० ०५७.

• मी वय वर्षे ३० चा विवाहीत परंतु एक नास्तीक. मी आजतागायत कोणत्याही मूर्तीपुढे मनापासून झुकलो नाहीं. मी ब्राम्हण असूनही मला कोणतेही मंत्रतंत्र किंवा शास्त्रोक्त पूजाअर्चा येत नाहीं. ती शिकण्याचा प्रयत्नही कधी केला नाहीं. कांही वेळा मला देवालयात जावे लागले पूजा वगैरे करावी लागली पण ती केवळ कुटुंबामध्ये संघर्ष नको म्हणून मी केली. मनापासून नाही. माझा जसा मूर्तीपूजेवर विश्वास नव्हता तसा प्रार्थनेवरही नाहीं. माणसाची प्रगती किंवा अधोगती ही केवळ माणसाच्या अंगी असलेल्या सद्‌गुण, दुर्गुण, आणि बुद्धिमत्ता यावरच अवलंबून असते असा माझा ठाम विश्वास. मूर्तिपूजे-वरील विश्वास उडण्याची कारणेही तितकीच प्रबळ आहेत. त्यापैकी एक म्हणजे मूर्तीपूजेचे माजवले जाणारे अवडंबर, होम हवन यासाठी दिलेले बळी किंवा देवतांच्या प्रसन्नतेसाठी केलेले अवाढव्य खर्च आणि ते करताना त्यातील पिळ-णूक आणि भ्रष्टाचार ३. बडवे किंवा पुजारी यांनी केलेल्या खोटेपणा लबाडी देव उघड्या डोळ्यांनी त्याच्यासमोर चाललेले प्रकार पहातो परंतु त्यांना शासनाकडून नव्हे तर परमेश्वराकडूनही शासन न होता ते गब्बर झालेली कित्येक उदाहरणे आहेत.

माझा मूर्तीपूजेवर जसा विश्वास नाही तसाच 'बुवाबाजीवरही नाही. बुवाबाजीच्या मी अत्यंत विरोधी आहे. येथे उल्लेख करण्यास हरकत नाही की, मी जेव्हां पुणे—नगर रस्त्यावरील वाघोली गावी होतो त्यावेळी सन १९७५—७६ मध्ये पुणे परिसरात माऊली महाराज (नंगा महाराज) चे प्रस्थ फार माजलेले होते, त्यांना हजारो भक्तगण होते. माऊली महाराजांचे प्रसादाचे जेवण माझ्या घरी म्हणजे माझ्या मोठ्या भावाकडे होई. आमच्या घरात माऊली महाराज जेवतात हा कृपेचाच भाग आहे असे कित्येकांना वाटे परंतु मी मात्र त्याच्या विरोधी होतो. माऊली महाराजांपुढे कित्येकजण लोटांगण

घालीत त्यांचे मूत्र तिर्थ म्हणून प्राशन करीत पण मी कधी त्यांचेपुढे लवलो नाही उलट त्यांचे ढोंग आहे आज ना उद्या बाहेर पडेल ह्याचाच प्रचार केला. अर्थात सर्व भक्तगण भारावलेले होते त्यामुळे माझे ऐकतो कोण? परंतु काही वर्षानंतर का होईना नंग्या बाबांचे (माऊली महाराज) चे नंगेपण सर्वांना कळले. माझा अंदाज खरा ठरून सत्य उजेडात आले आणि माझे मन सुखावले.

मी सध्या पाल्यांत एका समाजसेवी संस्थेत काम करीत आहे त्यामुळे माझा आणि समाजातील सर्व स्तरातील लोकांचा पुष्कळ संपर्क आहे. त्यातील कित्येक माझे मित्र आहेत मित्र म्हटल्यावर चर्चा, गप्पा वगैरे होतातच त्यावेळी अनेक मित्रांच्या गप्पातून मला साईबाबा बद्दलची माहिती मिळाली. अनेकांनी चमत्कार सांगितले. तरीही माझी श्रद्धा साईवर बसेना. काही मित्रांनी प्रत्यक्ष शिर्डीस जाऊन या म्हणजे तुम्हाला कळेल असे सांगितले परंतु तरीही मनात नास्तीकत्वाचा जोर असल्याने केवळ मूर्तीदर्शनासाठी आणि स्थानमहात्म्य म्हणून शिर्डीस जा आणि १००:१५० रुपये खर्च करा हे मनाला न पटणारे होते. तेव्हां स्वत:च्या खर्चाने शिर्डीस जावयाचे नाहीं असे ठरवले.

दुसरीकडे माझे मन विचार करू लागले की, लाखो लोक साईभक्त आहेत कित्येक चमत्कार घडतात असे वाचले आहे ऐकले आहे तेव्हां यात काहीतरी तथ्य आहे असे वाटू लागले. परंतु जगाला काहीही अनुभव आले आणि चमत्कार झाले तरी स्वत:ला अनुभव आल्याशिवाय तर माझा विश्वासच बसणार नव्हता.

माझी पत्नी सौ. कल्पना ती गरोदर होती. बाळंतपणाचे दिवस भरत आले होते. दि. ४ जून १९८० ची रात्र मी झोपताना रात्री ११ वाजता माझ्या मनात साईपरिक्षा घ्यावयाची इच्छा झाली आणि मी कधी नव्हे तो त्या रात्री साईची प्रार्थना केली की, "हे साई मला पुत्ररत्न होऊ दे." आणि मी झोपलो. पहाटे ५–४५ वाजता माझ्या दारावरची बेल वाजली म्हणून मी उठलो आणि दरवाजा उघडला तर माझा मेव्हणा दारात उभा! तो मालाडहून आला होता त्याला का आला म्हणून मी विचारले तर त्याने सौ. कल्पना पहाटे ३–३० वाजता बाळंत झाली असून मुलगा झाल्याचे सांगितले. माझ्यासारख्या नास्तीकत्वाकडे झुकणाऱ्या माणसास ह्या साईच्या अनुभवाने किती आश्चर्य वाटले असेल याची कल्पना वाचकानेच करावी. माझ्या दृष्टीने मुलगा झाला ही गोष्ट आनंदाची होतीच त्याहीपेक्षा जास्त आश्चर्याची होती.

मी रात्री झोपताना केलेली साईची प्रार्थना आणि सकाळी उठून ऐकलेली बातमी या गोष्टीमुळे माझे मन साईकडे झुकले, आणि मी उघडपणे साईबाबांचा स्वीकार केलेला नसला तरी मनातून मात्र चरकलो होतो.

माझा दुसरा अनुभव म्हणजे मी वर उल्लेख केल्याप्रमाणे शिर्डीस स्वतःच्या खर्चाने जावयाचे नाही असे ठरवले होते. तेथेही मला अनुभव आला की, माझे निकटचे मित्र सुप्रसिद्ध सिनेपार्श्वगायक श्री. जयवंत कुलकर्णी हे निस्सीम साईभक्त आहेत ते नेहमी मला शिर्डीचे अनुभव, बाबांनी घडवलेले चमत्कार सांगत आणि एकदा तुम्हीही शिर्डीस जाऊन या असे सुचवित. एकदा ते असेच अचानक माझ्याकडे आले आणि तुम्ही शिर्डीस चलाच मी तुमची जाण्यायेण्याची तिकिटे काढली आहेत असे सांगून मला शिर्डीस घेऊन गेले. श्री. जयवंत कुलकर्णी बरोबर गेल्याने शिर्डी–साकोरी येथे जवळून साईदर्शन झाले आणि एक रुपयाचाही शिर्डीस जाण्यायेण्याचा खर्च झाला नाहीं. मला शिर्डीस स्वतःच्या खर्चाने घेऊन जाण्याची बुद्धि श्री. जयवंत कुलकर्णी यांना साईने तर दिली नाही ना? नाहीतर या महागाईच्या दिवसात कोण कोणासाठी खर्च करतो?

मला आलेल्या दोन अनुभवामुळे साई नामात काहीतरी जादू आहे असे वाटले आणि पुन्हां एकदा श्री. जयवंत कुलकर्णी यांनी मार्च ८३ मध्ये शिर्डीस त्यांच्याच खर्चाने चला असा आग्रह केला त्यावेळी मात्र कोणत्याही प्रकारचे आढेवेढे न घेता मी शिर्डीस जाण्याचे कबूल केले आणि गेलो.

शिर्डीस गेल्यावर आम्ही दुसऱ्या दिवशी दर्शनास निघालो श्री. कुलकर्णी यांनी माझ्याकडे उदबत्तीचा पुडा आणि त्या पेटवण्यासाठी आगपेटी दिली. श्री. जयवंत कुलकर्णी यांनाही माझा स्वभाव माहीत असल्यामुळे त्यांनी मला नमस्कार करा, सत्यनारायण करा, अभिषेक करा, उदबत्ती लावा, नारळ फोडा वगैरे कोणत्याही प्रकारचा आग्रह न करता ते मला दर्शनासाठी बरोबर घेऊन गेले. ते वेगवेगळ्या मूर्तीजवळ जात हार घालीत, आणि मला उदबत्ती पेटवून देण्यास सांगत. ते देवळात गेले तरी मी आपला पायात बूट घालून देवळाच्या किंवा मूर्तीच्या समोर उभा राही आणि त्यांनी उदबत्ती मागीतली की ती पेटवून द्यावयाची एवढेच माझे काम. असेच दर्शन करीत करीत ते शनीच्या मंदिरासमोर आले मी आपला बूट घालून लिंबाच्या झाडाखाली थोड्या अंतरावर आणि साईमंदिराच्या अगदी प्रवेशद्वाराच्या समोर उभा होतो. तेवढ्यात

माझ्या डोक्यात साई परीक्षा घ्यावयाची लहर आली की, जर माझ्या हातातील आगपेटी माझ्या हातून खाली पडली तर मी साईपुढे नतमस्तक होईन असे मनात म्हटले आणि त्याचबरोबर माझ्या हातून काडेपेटी पडू नये म्हणून ती घट्ट पकडली. जेव्हा जयवंत कुलकर्णी यांनी उदबत्ती मागीतली त्यावेळी ती पेटवण्यासाठी मी काडी ओढली त्यावेळी काडेपेटी हातात घट्ट पकडली होतीच. काडी ओढली गेली आणि ती उदबत्ती जवळ नेली तेवढ्यात वाऱ्याची एक झुळूक आली आणि मी पेटवलेली काडी विझली गेली. दुसरी काडी पेटवण्यासाठी काडी ओढणार तेवढ्यात कसे काय झाले साईस ठाऊक माझ्या बलदंड हातातून एवढीशी काडेपेटी पट्दिशी जमिनीवर पडली. मी आश्चर्यचकित झालो. श्री. जयवंत कुलकर्णी यांना ही घडलेली गोष्ट सांगितली त्यांनाही नवल वाटले. आता मात्र मी साईभक्त झालो आहे एवढेच नव्हे तर कोणत्याही देवापुढे वर्षोन वर्षे नतमस्तक न होणारा मी पहाटे ३-४५ वाजता उठून स्नान करून द्वारकामाईचे द्वार उघडण्या अगोदर तेथे जावून नंतर पहाटे ४ वाजता द्वारकामाईचे आवार झाडण्यापर्यंत माझ्या मनात बदल झालेला आहे. ही सर्व साईकृपाच आहे असे मला वाटते.

माझ्यासारखे विचार असणारे अनेकजण असतील तर त्यांना एवढीच विनंती की, साईपरीक्षा पाहण्यात वेळ वाया न घालवता साईमय व्हा.


## श्रीसाईलीला

### गुरुपौर्णिमा अमृत महोत्सव विशेषांक

श्रीसाईबाबांनी १९०८ साली शिरडीला गुरुपौर्णिमेचा पहिला उत्सव साजरा केला तेव्हांपासून हा उत्सव तिथे दरवर्षी अतीव उत्साहाने साजरा होत आलेला आहे. यंदा बाबांनी सुरू केलेल्या या उत्सवाला ७५ वर्षे पूर्ण होतात. श्रीबाबांच्या या उत्सवाच्या अमृतमहोत्सवा निमित्त श्रीसाईलीला खास अंक प्रकाशित करीत आहे.

मुखपृष्ठावर श्रीबाबांचे अतीमनोहर चित्र

पृष्ठे ६४) (किमत १ रुपया

# बाबांची लीला अगाध आहे

—श्री सच्चिदानंद गो रोडे
३०९ कोळी आळी महाबळेश्वर ४१२८०६

● मी गेली २० वर्षे श्री साईबाबांची भक्ती अत्यंत मनोभावे करीत आहे. तसेच या काळात मला श्रीसाईबाबांनी अनेकवेळा त्यांच्या अकराही अकरा वचनांची प्रचिती व चमत्कार दाखविले आहेत. त्यामुळे आमची उभयतांची श्रीबाबांच्या ठायी अढळ श्रद्धा व सबुरी आहे.

कोणतेही लहान किंवा मोठे संकट येवो, अडचणी येवोत, श्री बाबांना अत्यंत मनोभावे हाक मारावी बाबा कोणाच्याही रूपाने येऊन संकट निवारण करून गेल्याशिवाय राहणार नाहीत. असे अनेक अनुभव आम्हांला आलेले आहेत. तसेच नित्याच्या व्यवहारात सतत आपल्या पाठीशी ते उभे असतात.

माझी एकदा मान अवघडल्यासारखी झाली होती. खुपच त्रास होत होता. इकडे तिकडे मुळीच बघता येत नव्हते परंतु किरकोळ असेल, २–४ दिवसांनी बरे वाटेल म्हणून मी दुर्लक्ष करून इलाज काही केला नाहीं. पुढे त्रास जास्तच होत गेला काही सुचेना मग बाबांची उदी दिवसातून अनेक वेळा मानेला चोळू लागलो व पोटातही पाण्याबरोबर घेऊ लागलो.

५–६ दिवस झाले काहीहि गुण पडेना. शेवटी श्री बाबांच्या फोटोपुढे उभा राहिलो, तो दिवस बुधवारचा होता. बाबांना म्हणालो, बाबा, ह्याच उदीने तुम्ही अनेकांचे असह्य आणि दुर्धर रोग बरे केले आहेत, आणि माझी साधी मान ह्या उदीने बरी होऊ नये, आणि म्हटलं बाबा, उद्या गुरुवार आहे जर पुढच्या गुरुवारच्या आत माझी मान मोकळी झाली तर मी हा अनुभव साईलीला मासिकात न विसरता देईन.

आणि काय चमत्कार त्याच दिवसापासून रोज इतका फरक पडत गेला मानेत की दोनच दिवसात मान संपूर्ण मोकळी झाली. पहा लगेच बाबा धावून आले.

श्री बाबांची उदी ही खरोखर एक अती दिव्य औषधी आहे यात जराही शंका नाहीं. परंतु श्री बाबांच्या ठायी अत्यंत प्रेम, श्रद्धा व सबुरी ही असायास पाहिजे. आपल्या हृदयात अखंड हरिः ॐ बाबा चा जयघोष चालला पाहिजे.

श्री बाबांची लीला अगाध आहे तसेच त्यांचे भक्तावरचे प्रेमही अगाध आहे.

●

'जया प

० प्रत्येकाला आ
हृदरून, गांगरून
मिळावा असे वाट
असेल तर आपण
श्री बाबांवर श्रद्ध
असाच एक अनुभ
माझे लग्न ७
७५ साली मी प्रथम
मला स्वप्नात दर्शन
झाला. माझे पति
बाबांना मनातल्या
आले तर फार
त्रास फारच होऊ
झाला तर ऑपरेशन
केली की, "बाबा तु
साईलीलेत देईन असे
परंतु हे लेबलच्या
शिवाजवळ बोलले. तू
तेवी ते तू केळ्याबरो
म्हटल व त्यांनी औ
पुडी उघडली तर त्य
त्यांनी ती उदी केळ
ती त्यांना घ्यायला
झालेला नाहीं, व त्य
आम्ही दोनदा शिर्डी
अशीच साईकृपा
करते.
ज्या ज्या ठिकाण
मी ठेविते मस्त

# 'जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव'

—सौ विद्या जयंत वाभोळकर
एच।२५ आंबेकर नगर, परळ व्हिलेज,
मुंबई ४०० ०१२.

० प्रत्येकाला आयुष्यात अडचणी या येतच असतात. काही काही वेळा मन हादरून, गांगरून जाते व कोणत्या तरी दैवी शक्तीचा आपल्याला आधार मिळावा असे वाटू लागते. परंतु आपली जर एखाद्या गोष्टीवर जास्त निष्ठा असेल तर आपण त्या अडचणीचा भार कमी किंवा नष्ट करू शकतो. त्याप्रमाणे माझी बाबांवर श्रद्धा आहे. व त्याची प्रचिती बाबा मला खूप वेळा करून देतात. असाच एक अनुभव —

माझे लग्न ७६ साली बाबांच्या कृपेने मोठ्या अडचणीतून पार पडले. ७५ साली मी प्रथमच शिरडीला जाऊन आले होते. त्यानंतर ८१ साली बाबांनी मला स्वप्नात दर्शन दिले व थोड्याच दिवसात शिरडीला जाण्याचा योगायोग आला. माझे पति नास्तिक नाहीत परंतु फार केलेले त्यांना पसंत नसे. मी बाबांना मनातल्या मनात नेहमी म्हणायची की बाबा हे सुद्धा तुझी भक्ती करू लागले तर फार बरे होईल. त्यानंतर काही दिवसांनी 'यांना' मूळव्याधीचा त्रास फारच होऊ लागला. डॉ. ने सांगितले ऑपरेशन करावयास लागणार. मला तर ऑपरेशनची फार भीती वाटत होती. म्हणून मी बाबांनाच प्रार्थना केली की, "बाबा तुम्हीच यातून मार्ग दाखवा यांना बरे वाटले तर हा लेख साईलीलेत देईन असे म्हटले व बाबांची उदी रोज यांना पाण्यातून देऊ लागले. परंतु हे तेवढ्या भक्तीने ती घेत नसत. असेच बोलता बोलता हे स्वतःच्या मित्राजवळ बोलले. तुला जर वाटत असेल तर मी एका गुरुकडून औषध आणून देतो ते तू केळ्याबरोबर खायच व परत वर्षभर केळ खायच नाहीं. यांनी हो म्हटल व त्यांनी औषध आणून दिल. दुसऱ्या दिवशी औषध घ्यायला म्हणून पुडी उघडली तर त्यात बाबांची उदी! माझ्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्यांनी ती उदी केळ्यात कालवून श्रद्धेने घेतली. बाबांनीच त्यांच्या मित्राकरवी ती त्यांना घ्यायला लावली असे मी मानते. त्यानंतर यांना त्या व्याधीचा त्रास झालेला नाहीं, व त्यांची सुद्धा अतिशय श्रद्धा बाबांवर बसली आहे. त्यानंतर आम्ही दोनदा शिर्डीला जाऊन आलो.

अशीच साईकृपा आम्हां सर्व भक्तांवर असू देत अशी साईचरणी प्रार्थना करते.

**ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे, त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे**
**मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी, तेथे बाबा तुमचे पाय दोन्ही** ☆

# असाध्य कॅन्सर ही साईकृपेने बरा झाला !

—श्री लक्ष्मण गोविंद देशपांडे
५७–७, कोयना कॉलनी,
मु. पो. गांधीनगर,
कोल्हापूर–४१६ ११९.

• संकटे आणि रोग कधी एकेकटेच येत नसतात. माझ्या पत्नीला गेल्या अदमासे बारा वर्षांपासून तरी मधुमेहाचा विकार जडलेला आहे. देहाला एका औषधाची संवय झाली, की त्या औषधाचा पुढे पुढे उपयोग होत नसतो. मग ते औषध बदलून दुसरे औषध चालू करायचे; पुढे त्याचा गुण येईना म्हणून तिसरे औषध चालू. असे करीत करीत शेवटी आता गेल्या ३–४ वर्षांपासून 'लॅंटे' व 'प्लेन' अशी दोन्हीही इन्सुलिन इंजेक्शने रोज तिला घ्यावी लागतात. तिला ब्लडप्रेशरही वाढलेले असलेने, त्यावरही एफिड्रिनच्या गोळ्या पूर्वीपासूनच चालू आहेत. यात भर म्हणूनच की काय, तिला कॅन्सरचाही रोग जडलेला आहे. नऊ वर्षांमागे एकदा त्यावर ऑपरेशन झाले; पण पुढे पाच महिन्यातच पुनः त्याच जागी गाठ धरली म्हणून, शेवटी मुंबई लांब गैरसोयीचे, खर्चिक व अपरिचित ठिकाणी सर्वांनाच त्रास म्हणून मुंबईस टाटा हॉस्पिटलकडे न जाता, जवळच, रेडिओलॉजी ट्रीटमेंटची सोय आहे म्हणून मिरजेलाच मिशन हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करवून घेतले. ते चालू असतानाच त्या छातीजवळच काखेनजिक आणखी एक कॅन्सरची गाठ आढळून आली. तीही काढून टाकली. मधुमेहामुळे असावे, ही ऑपरेशनची जखम लौकर वाळली नाही; वाळायला बरेच दिवस लागले. रेडिएशन ट्रीटमेंट घेऊन या दुखण्यातून ती हळूहळू बरी झाली. अधूनमधून 'चेक अप' साठी आम्ही मिरजेस जाऊन येतच असू. पुढे चारच वर्षांनी पुनः ट्रीटमेंट करून घ्यावी लागली. या रेडिएशनचा परिणाम म्हणूनच की काय त्यावेळच्या मुख्य डॉक्टरांनी केस पेपरमध्येच तेव्हाच नमूद करून ठेवल्याप्रमाणे तेव्हाच एक्स-रे फोटो काढला त्यातच तिच्या मानेखाली बरगडीच्या दुसऱ्या फासळीवर एक बारीकसा ठिपका दिसला, व तोच आता गेल्या २–२॥ महिन्यांत आपला प्रताप दाखवू लागला आहे. ऑपरेशन झाल्या भागातून एका ठिकाणी छिद्र पडून त्यातून अल्प प्रमाणात पू निघत आहे.

पहिल्यांदा ऑपरेशन झाले त्यावेळी यातून पार पडलो असे वाटले. दुसऱ्यांदा ऑपरेशनची वेळ आली तेव्हा मात्र आम्ही अधिकच भिऊन गेलो. आता यातून निभावत नाही, अशीच आमची धारणा झाली. मनुष्य हतबल झाला, मानवी प्रयत्नांतून यश मिळेनासे झाले की तो मग सहजच अगतिक होतो; आपल्या तोकडेपणाची त्याला मनापासून जाणीव होते, व त्याला देव आठवतो; आता कुणाला तरी शरण जावे, या संकटातून वाचवावे म्हणून तो त्या अदृश्य शक्तीची मनोमन याचना करतो. माणसाचा स्वभावच आहे, ठेच लागली की मग लगेच त्याच्या तोंडून 'अग आई गऽ' असे शब्द त्याला नकळत बाहेर पडतात. माझे एक साडू बेळगावचे श्री. मंगेशराव सबनीस यांची साईबाबांवर गेली २७ वर्षे नितांत निष्ठा आहे. मागे त्यांच्या टिंबर धंद्यावर मोठे गंडांतर आले होते; तेव्हा त्यांना कुणीतरी श्रीसाईबाबांची आराधना करायला सांगितले होते. त्या प्रमाणे त्यांनी श्रीसाईबाबांची आराधना सुरू केली, सप्ताह केले, शिरडीला जाऊन आले. त्या गंडांतरातून ते सहीसलामत तावून सुलाखून पार पडले. त्यांचा धंदा आता पूर्वीपेक्षाही कितीतरी पटीने मोठा वाढता झाला आहे. दरसाल २–३ वेळा असे गेली कित्येक वर्षे ते शिरडीला श्रीसाईबाबांच्या सेवेसाठी केव्हा एकटे, तर केव्हा सहकुटुंब जात असतात. या दुसऱ्या ऑपरेशनच्या वेळी, त्यांनी माझ्या विनंतीप्रमाणे मला ताबडतोब आपल्याकडील श्री साईबाबांची ऊदी पाठवून दिली. 'या ऑपरेशनमधून माझी पत्नी सहीसलामत पार पडू दे, तिला गुण येऊन ती चांगली बरी होऊ दे, आम्ही उभयता तुमच्या भेटीसाठी शिरडीस येतो', असे मी मनातल्या मनात श्री साईबाबांची मूर्ती डोळ्यांपुढे आणून त्यांच्याकडे मागून घेतले होते. मोठेच नवल घडले! कॅन्सरच्या रोगातून सहसा कुणी वचावत नाही. जगलाच तर, फारतर एक दोनच वर्षे! माझ्या पत्नीचे तर हे मोठ्ठेच व दुसरे ऑपरेशन; त्यातच तिला मधुमेह ब्लडप्रेशरसुद्धा! असे असून ही, ती यातून पार पडली. गेली ८–९ वर्षे ती प्रकृतीने ठीकच आहे. याला कारण आमचा व तिचाही बाबांवर विश्वास, त्याचबरोबर आपण बरी होऊच असा मनोनिग्रह व श्री साईबाबांची आमच्यावर कृपा, हेच होय. आम्ही मग यथाकाली उभयता व मग मी एकटाही, केव्हा तिच्यासह केव्हा मुलग्यासह, असा ५–६ वेळा शिरडीला जाऊन आलो. एकदा जाऊन आलो की पुनः जावेसे वाटते. श्रीसाईबाबांवरील श्रद्धा वाढते व पुनःपुनः जाऊन यावेसे वाटू लागते. श्रीसाईबाबांचे दर्शन डोळे भरून घ्यावे, अभिषेक करावा, आपल्या हातानी त्यांच्या गळ्यात हार घालावा, स्पर्श करून पायांना वंदन करावे, पूजा आरत्या पहाव्या, ऐकाव्या असे वाटते, व प्रत्यक्ष असे घडल्याने मनाला मोठे

समाधान लाभते. झोपताना श्रीसाईबाबांचे स्तवन करून झोपतो व उठतानाही प्रथम श्रीसाईबाबांचेच फोटो दर्शन घेतो. हा आमचा परिपाठ आहे, नित्याचा.

आम्ही तीन वेळा गोवा यात्राही पदरात पाडून घेतल्या, व आम्हाला सुद्धा आश्चर्य वाटले की, आम्हा उभयतानी मिळून अशा प्रकृतीमानात, अशा वयात (पत्नीचे वय ६०–६१ वर्षे व माझे ७१ वर्षे) हरिद्वार, हृषिकेश, दिल्ली, आग्रा मथुरा, काशी, गया, अलाहाबाद अशा (टूरिस्ट गाड्यांतून नव्हे.) यात्राही अलिकडे साधून घेतल्या आहेत. आता मनुष्य म्हटला की, जसा त्याला जन्म आहे, तसा मृत्यूही पण अटळ आहे. केव्हातरी एकदा या मृत्यूशी गाठ पडणारच. अमर कुणीही नाही. म्हणून का भिऊन पळून जायचे ? पळून पळून कुठे जाणार ? त्याला धीराने सामोरे जाणेच योग्य आहे. मुलां-मुलींचे शिक्षण, लग्ने पार पडली आहेत. आम्ही समाधानी आहोत. साईबाबांनी आम्हाला इथवर निभावून आणले आहे. लोकांना वाटले, "मुळातच तो कॅन्सर नसावा; म्हणूनच ही बाई जगली आहे. शेकडा चार टक्केसुद्धा लोक कॅन्सरमधून जगत नाहीत." आम्ही म्हणजे माझी पत्नी त्या चार टक्क्यात मोडणाऱ्यांपैकी एक आहे हे निश्चित. याचे सारे श्रेय श्रीसाईनाथालाच. आम्ही मूळात नास्तिकही नव्हे, व देवाच्या मागे मागे सारखे लागणारेही नव्हे. तरीपण, श्रीसाईबाबांवर जी आमची भक्ती, नितांत श्रद्धा जडली आहे, ती दिवसेंदिवस वाढतेच आहे. आता येईल त्या कटू प्रसंगाला आम्हाला धैर्याने तोंड द्यावेच लागणार. त्याला आमची तयारी आहे. "कर्मण्येवाधिकारस्ते ।' या गीतावचनाप्रमाणे श्रीसाईसेवा, औषधोपचार व रोज उदीचा प्रसाद घेणे, हे नैसर्गिक होऊन बसले आहे. मी तर नेहमी मनातल्या मनात म्हणत असतो (यात दिखाऊपणा मुळीच नाही.) "साईबाबा साईबाबा ! ध्यान" आपुले करीतसे; तुमच्या चरणी मुक्ति मिळावी, तुम्हास यास्तव प्रार्थितसे !"

# साईकृपेचा अनुभव

—सौ. मीना वसंत मेहेर
मच्छिमार कॉलनी, बि. नं. ११-४०४,
माहीम, मुंबई—१६.

• माणसाच्या जीवनात अनेक अडचणी येतात. आपली भक्ती ज्यांच्यावर आहे त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून आपण आपले कार्य करीत राहिल्यास यश हे हमखास येते. मी एक साईबाबांची भक्त आहे. त्यांचेवर माझी अत्यंत निष्ठा आहे. मी नेहमी त्यांचाच धावा करीत असते. बाबांनी मला संकटातून बरेच वेळा मुक्त केली आहे. त्यातील एक अनुभव.

मला डॉक्टरांनी सांगितले होते की, तुझे ट्यूमरचे, ऑपरेशन करावे लागेल. नंतर मी दिवाळीच्या सुट्टीत माझ्या ओळखीच्या डॉक्टरांकडून के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करावयाचे ठरविले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी मला २० नोव्हेंबर १९८२ रोजी शनिवारी तपासून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून घेतले.

मी दोन दिवस हॉस्पिटलमध्ये होते. मंगळवारी सकाळी ऑपरेशन करावयाचे नक्की ठरविले. ऑपरेशन टळावे म्हणून मी साईबाबांची सारखी, धावा करीत असे. मी साईबाबांना सारखी विनवणी करायची, "बाबा तुमची जर माझ्यावर" खरोखर कृपा असेल तर, माझे ऑपरेशन रद्द होईल." शेवटी ऑपरेशनच्या आदल्या दिवशी म्हणजे सोमवारी सकाळी डॉक्टरांनी परत दुर्बिणीच्या साहाय्यान आतून तपासले.

आणि काय आश्चर्य ! डॉक्टर म्हणाले. आता ऑपरेशन करावयास लागणार नाही. मी मनोमन समजले. माझी हाक साईकृपेने ऐकली होती व हे संकट टळले.

माझे ऑपरेशन टळले तर मी हा अनुभव साईलीलेत देईन असा मी नवस बोलले होते. तो आज मी पूर्ण करीत आहे.

श्रीसाईबाबांची कृपा पाठीशी सदैव रहावी हीच प्रार्थना !

# बाबांनी लक्ष्मीरूपात दर्शन दिले !

श्री. हेमंत हळवे,
अहिरेश्वर वाडी, मुकुंदनगर,
पुणे–४१० ०३७.

• पूज्य साईबाबांनी कोणाला फोटोच्या रूपात, कोणाला सन्याशाच्या रूपात तर कोणाला दुसऱ्या इतर रूपात दर्शन दिल्याची अनेक उदाहरणे श्री साई सच्चरित्रात व श्रीसाईलीला मासिकात आलेली आहेत. मला साईबाबांनी दिलेले दर्शन आणि मला आलेला अनुभव साई भक्तांना नक्कीच सुखद वाटेल.

१९८२ सालातील दिवाळीचे दिवस. नुकतेच साईलीला मासिक आलेले होते. साईबाबांनी कॅलेंडरच्या रूपात येऊन दर्शन दिले अशा अनुभवाचा लेख वाचत असताना मी विचार करू लागलो. मला साईबाबा दर्शन देणार नाहीत का? वाचता वाचता मी साईबाबांना मनातल्या मनात प्रार्थना केली, की "बाबा" माझ्यावर तुमचे खरोखर प्रेम असेल तर तुम्ही कोणत्या तरी रूपाने माझ्याकडे आले पाहिजे. आणि माझी प्रार्थना बाबांनी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पूर्ण केली –

माझी पत्नी घराजवळच एका ठिकाणी विनामोबदला लायब्ररीचे काम करते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी, ऐन पूजेच्या वेळेस माझी पत्नी ज्यांच्याकडे काम करते, त्या गृहस्थांच्या सौभाग्यवतीनी एक मोहोर भेट म्हणून आणून दिली. अशा तऱ्हेची भेट मिळेल अशी आम्हाला स्वप्नातही कल्पना नव्हती. पण बाबा प्रार्थना ऐकून लक्ष्मीच्या रूपात आमच्याकडे आले. आणि "नित्य मी जिवंत" जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचिती अनुभवे " याची प्रचिती दिली.

---

## श्री ग रा पालकर यांना गुणवंत कामगार पुरस्कार

श्रीसाईलीलाचे गद्य–पद्य लेखक श्री. ग. रा. पालकर यांचा महाराष्ट्र-शासनाने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार १९८३ देऊन गौरव केला. उप मुख्यमंत्री श्री. रामराव आदिक यांचे शुभहस्ते हा पुरस्कार ता. १ मे ८३ रोजी क्रिडाभवन मुंबई येथे देण्यात आला. श्री. पालकर यांचे हार्दिक अभिनंदन.

# बाबांचे दोन अनुभव

— श्री. प्रभाकर डी. गोडबोले,
फडनीस की गोठ, ग्वालियर.

● मी मागील वर्षापासून श्रीसाईनाथ महाराजांची ५३ अध्यायांची पोथी विजयादशमी पासून सात दिवस पर्यंत वाचून आठव्या दिवशी अवतरणिका अध्याय वाचून सप्ताहाचे समर्पण करीत असतो. यावर्षीही २७ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर पर्यंत सप्ताहाचे वाचन केले. पहिले दोन दिवस चांगले पार पडले. परन्तु तारीख २९ रोजी मी दुचाकीवरून जात असताना एकदम ३–४ मध-माशांनी माझ्या उजव्या डोळ्याला कडकडून चावा घेतला. क्षणभर माझ्या डोळ्यांपुढे अंधारी आल्यासारखे वाटले. मी कशीबशी दुचाकी बाजूला ठेवून थोडावेळ खाली बसलो. मग हळू हळू मार्ग चालत घरी आलो. माझे डोळे अगदी सुजून गेले होते. भयंकर आग होत होती. डोळे उघडण्यास त्रास होत होता. तरी घरचा इलाज केला. डॉक्टरकडून गोळ्या आणल्या. मनात सारखी सप्ता-हाची काळजी होती. सप्ताहात खंड न पडो ही साईनाथापाशी प्रार्थना केली, व झोपलो. काय आश्चर्य ! मी रोजच्याप्रमाणे दुसरे दिवशी सकाळी उठलो. आंघोळ केली. सप्ताह वाचन सुरू केले. मला वाचण्यास मुळीच त्रास झाला नाही व डोळ्यांची आगही झाली नाही. पोथी झाल्यावर पूर्ववत आग सुरू झाली. म्हणजे साईनाथांनी ते संकट दूर करून सप्ताहात खंड पडू दिला नाही. या प्रत्यक्ष अनुभवावरून मला बाबांनी म्हटल्याप्रमाणे जरी मी देह दिला टाकून, तरी मी येईन भक्तांचे दु:ख दूर करण्यासाठी ' या बोधवाक्याची आठवण झाली.

माझ्या जीवनात घडलेली ही महत्त्वाची घटना आहे. मी केंद्रीय सरकार कार्यालयात लेखापरीक्षक म्हणून कार्य करीत असतो. एकदा असेच एक फाईलचे कार्य माझ्यापाशी होते. मी फंड अनुभागात कार्य करीत असल्यामुळे अंतीम भुगतान प्रकरण वगैरे करावे लागतात. असेच एक पत्र जे आमच्या महालेखाकार तर्फे अनुभागात आले होते, परंतु हे पत्र १ महिन्यानी अनुभागात आले होते.

त्यात थोडक्यात असे होते की, अभिदात्याचा मृत्यू झाला होता. त्याचे वारस दत्तक घेतलेला मुलगा व स्वत:चा मुलगा असे होते. दत्तक घेतलेल्या मुलांनी कोर्टाकडून एफेडेव्हीट केले होते, व भुगतान त्यालाच झाले पाहिजे अशी

मागणी केली होती. शेवटी वरिष्ठ अधिकाऱ्याच्याकडे ही फाईल जाणे आवश्यक होते. कारण याबद्दल त्यांची स्वीकृती आवश्यक होती. जेव्हा ही फाईल वरिष्ठ अधिकाऱ्याजवळ गेली. त्यावेळेस त्यांनी शेरा मारला की पत्राची पोच फार उशीरा झाली आहे. तेव्हा लेखापरीक्षकास याचे कारण विचारा! वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या शेऱ्यामुळे लवकरच अंमल झाला व मला कायदेशीर मेमो दिला. मेमो मिळताच माझे हातपाय लटपटू लागले. मनातल्या मनात मी साईनाथांची प्रार्थना सुरू केली. साईनाथा तूच आता या संकटाच्या वेळी येऊन मला तार. मी आपल्या परीने मेमोचे उत्तर दिले होते. काय झाले होते की त्या पत्रावर जी तारीख मोहर होती त्याच्या २ महिन्यांनंतर हे पत्र अनुभागात आले होते. मी ज्या तारखेस हे पत्र घेतले होते त्याच्या २० दिवसांतर फाईल आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याजवळ ठेवली होती. पुन्हा ती फाईल वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेली होती. त्यांनी एकंदर माझ्या मेमोचे उत्तर वाचले व माझ्यावर कारवाई होणार नाही असा शेरा मारला. आलेले संकट असे टळले ते केवळ साईनाथांच्या कृपेने हे निश्चित. असे आहे माझे साईनाथ! दीनांचे कैवारी, संकट हरणारे बाबांना शतशत प्रमाण करून नतमस्तक होतो.

★


## साईलीला

**सर्वांग सुंदर व सर्वात स्वस्त दिवाळी अंक १९८३**

संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबांच्या जगभर पसरलेल्या असंख्य साई-भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयीच्या विविध अनुभवांनी अगदी गच्च असा सुंदर, संग्राह्य, वाचनीय अंक. ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

श्रीसाईभक्तांनी आपापले नवे, ताजे श्रीबाबांच्या बद्दलचे अनुभव कागदाच्या एकाच बाजूस थोडक्यात सुवाच्य लिहून ते १५ ऑगस्ट १९८३ पर्यंत संपादक श्रीसाईलीला 'साई निकेतन' १०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४ या पत्त्यावर पाठवावेत.

**मुलपृष्ठावर बाबांचे अती सुंदर चित्र**

पाने १२८)

**(किंमत अवघी २ रुपये**

# साईकृपा

– सौ. एस्. एन. मालवणकर
वसंतवाडी, टिळकनगर,
गोपाळ म्हात्रे, बिल्डिंग,
डोंबिवली (पूर्व).

* दोन-तीन वर्षांपूर्वी ध्यानीं-मनी नसता शिर्डीला जाण्याचा योग आला; व श्री बाबांची भव्य मूर्ती पाहून मन आनंदित झाले. कधी नव्हे ती मनःशांती मिळाली व इथून जाऊच नये असे वाटले. त्यानंतर 'साईलीला' मासिक वाचनात आले. त्याचवेळी आम्ही आमच्या खोलीच्या बाबतीत काळजीत होतो. म्हणून साईबाबांची महती वाचून मी मनात प्रार्थना केली की, 'श्री बाबा जर आमची खोलीबद्दलची काळजी मिटवाल, तर आमची तुमच्यावर आणखीन श्रद्धा बसेल; व मला आलेला अनुभव मी साईलीला मासिकात देईन.' त्यानंतर ८–१० दिवसातच सर्व काही मनासारखे होऊन खोली आमच्या नावावर झाल्याचे मालकाने सांगितले. ज्या गोष्टीचा दोन–तीन वर्षे मनःस्ताप झाला व मालक ऐकत नव्हते ती गोष्ट अशी अचानक सहजासहजी झाल्यामुळे आम्ही उभयता आश्चर्यचकीत झालो. ही श्री बाबांची कृपाच नाहीतर काय? या प्रसंगानंतर आम्ही नेहमीच श्री बाबांची आठवण करतो, व यथाशक्ती जमेल तशी सेवा करतो.

श्री बाबांना कोटी कोटी प्रमाण ! ४४

# संकटसमयी धावे मी भक्तांसाठी

–श्री संजय जयंत गुमास्ते
२५, व्यंकटेश प्रसाद,
एन्. सी. केळकर रोड, दादर,
मुंबई–२८.

* मी व माझा मित्र श्री. कुडतरकर, आम्ही दोघांनी मिळून दि. १६ जानेवारी ते १८ जानेवारी ८३ पर्यंत श्री अष्टविनायक यात्रा काढून ट्रॅव्हलच्या धंद्यात

पदार्पण करण्याचे ठरविले. बुकिंग सुरू झाले आणि दि. १४ जानेवारी पर्यंत एकूण ५० सीटपैकी फक्त ३५ सीटस् बुक झाल्या होत्या. १५ सीटस् दोन दिवसात मिळणे अशक्यच होते. नुकसान समोर दिसत होते. मी साईभक्त असल्याने फक्त श्री साईबाबांजवळ प्रार्थना केली आणि म्हटले, बाबा, आजपर्यंत कुठल्याच धंद्यात अपयश दिले नाहीस, मग आजच अपयश का दिसतंय.' आणि काय आश्चर्य ! १५ जानेवारी सकाळपर्यंत आणखी १२ सीटस् मिळून माझी पहिलीच यात्रा यशस्वी होऊन भरपूर फायदा झाला. वाटेत श्री गजाननाच्या व श्रीसाईबाबांच्या आशीर्वादाने कोठेच त्रास झाला नाही.

# मराठी ९ महिने व त्याचा सच्चरित्राशी संबंध

| | | |
|---|---|---|
| चैत्र | — | दरवर्षी रामनवमीला शिर्डीला मोठा उत्सव होतो. |
| ज्येष्ठ | — | भक्तश्रेष्ठ काकासाहेब दिक्षीत यांचे निधन |
| आषाढ | — | दरवर्षी गुरुपौर्णिमेला मोठा उत्सव होतो. |
| श्रावण | — | निंबवृक्षाखाली पादुकांची स्थापना. |
| भाद्रपद | — | भगत म्हाळसापती यांचे निधन. |
| आश्विन | — | दसऱ्याला बाबा समाधिस्थ झाले. |
| मार्गशीर्ष | — | पौर्णिमेला बाबांनी ब्रम्हांडी प्राण चढविला. |
| पौष | — | मकर संक्रांतीच्या दिवशी मेघाने बाबांना सचैल स्नान घातले. |
| फाल्गुन | — | होळीच्या दिवशी बाबा हेमाडपंतांकडे भोजनास गेले. |

— श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला, (पश्चिम), मुंबई ७०.

# नांदा सौख्यभरे !

### मंगला–सुहास शुभविवाह

श्री साईलीलाचे मान्यवर लेखक श्री. डी. आर. खडके, चेंबूर यांची पुतणी चि. मंगल, हिचा शुभविवाह चि. सुहास क. कुवळेकर, माटुंगा यांचेबरोबर ४ मे १९८३ रोजी बालविकास संघ हॉल, गांधी मैदान, चेंबूर येथे थाटाने साजरा झाला. वधूवरांचे अभिष्ट चिंतन !

### चव्हाण–भालेराव शुभलग्न

श्रीसाईलीलाच्या कवयित्री व ह. भ. प. सौ. कलावती वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र चि. अनिल यांचा शुभविवाह चि. सौ. कां. सुरेखा प्रभाकर भालेराव इजबरोबर १४ मे ८३ रोजी सकाळी १०–३६ वा. व सोमवंशी क्षत्रिय समाज मंगल कार्यालय, नारायण पेठ, पुणे येथे थाटाने पार पडला. वधूवरांचे मनःपूर्वक अभिनंदन !

### बाबरे–वाळके शुभमंगल

सुविख्यात साईभक्त डॉ. मधुसूदन सखाराम बाबरे यांची कन्या चि. सौ. कां. स्मिता हिचा शुभविवाह श्री. अविनाश प्रभाकर वाळके, डोंबिवली यांच्याबरोबर १६ मे ८३ रोजी सकाळी १०–०२ वाजता ब्राम्हण सेवा मंडळ, भवानी शंकर रोड, दादर येथे थाटाने साजरा झाला. वधूवरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातली नामवंत तसेच साईभक्त मंडळी हजर होती. वधूवरांचे मनःपूर्वक शुभचिंतन !

# बोलका अभिप्राय


–सौ. लिला डी. मराठे
अखिल भारत शेतमजूर शेतकरी संघ,
महाराष्ट्र शाखा, जि. धुळे


माननीय – श्री. चेंदवणकरसाहेब संपादक 'श्रीसाईलीला' मासिक यांसी अ. क्रु. सा. न. वि. वि.

साईलीलेचा एप्रिल अंक मिळाला. सुंदर मुखपृष्ठ पाहून आनंद झाला. साईलीला मासिकात नवीन माहितीपूर्ण लेख, व प्रसिद्ध तीर्थस्थळे यांची विविध माहिती वगैरे, अतिशय चांगल्या प्रकारे प्रकाशित केल्याने अंकाची सजावट भक्तांना आकर्षित करीत आहे.

उत्कृष्ट छपाई संपादकीय लेख फार चांगले वाटतात. या मासिकाची अशीच जगभर भरभराट होत राहो. अशी साई चरणी प्रार्थना! आपण माझ्या अहिराणी भक्ती कवितांचा जो मान मला श्री साईलीला मासिकातून मिळवून दिला त्या बद्दल आपली ऋणी आहे. कळावे लोभ असावा

आपली कृपाभिलाषी भगिनी
सौ. लिला डी. मराठे

## शेगावचे श्री गजानन महाराज शुभारंभाचा रंगतदार प्रयोग

शिरडीच्या श्रीसाईबाबांचे गुरु बंधू शेगावचे संत श्री गजानन महाराज हे होत. 'शिरडीचे श्रीसाईबाबा' या मराठी नाटकाचे शंभरावर यशस्वी प्रयोग करून झाल्यावर आरती थिएटर्सचे निर्माते श्री. कुमारसेन गुप्ते यांनी आता शेगावचे श्री गजानन महाराज यांचे तेजस्वी जीवन रंगभूमीवर आणण्याचा यशस्वी यत्न केला आहे. महाराजांच्या जीवना वरचे हे सुंदर नाटक श्री. मधुसूदन जोशी यांनी लिहिले असून दिग्दर्शन श्री. दीनानाथ लाड यांनी केले आहे. या नाटकाचे दोन-चार प्रयोग शिरडीस व इतरत्र झाले असले तरी मुंबैत शुभारंभाचा प्रयोग दि. १५ मे. १९८३ रोजी दु. ४ वा. प्रभादेवी येथील रविंद्र नाट्य मंदिरात करण्यात आला नागपूरच्या महाराणी कांचनमाला राजे भोसले याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रयोग संपल्यावर त्यांनी कलाकारांची मुक्त कंठाने प्रशंसा करून शेकडो प्रयोग या नाटकाचे रसिक भक्तजनांसमोर व्हावेत अशी सदिच्छा व्यक्त केली. या नाटकात ४२ कलाकारांचा संच असून श्री गजानन महाराजांची मुख्य भूमिका वसईचे श्री. हेमंत चिटणवीस यांनी अतिशय समजूतदारपणे वठविली आहे. संगीताची संपूर्ण बाजू निर्माते श्री. कुमारसेने गुप्ते यांनी सांभाळली आहे. एवढा मोठा संच असून सुद्धा सर्वच कलाकारांनी आपापल्या भूमिका चांगल्या वठविल्या आहेत. संत जीवनावर एक चांगले नाटक भक्तांसमोर ठेवल्या बद्दल श्री. कुमारसेन गुप्ते अभिनंदनास नक्कीच पात्र आहेत.

प्रत्येक साईभक्ताने व महाराजांच्या प्रेमीने हे नाटक निदान एकदा तरी पहावे अशी आमची शिफारस आहे.

—साईनंद

# साईलीला

(चाल : झाला महार पंढरीनाथ)

किती किती हो सांगू तुम्हाला ।
माझ्या साईच्या अगाध लीला ॥धृ.॥

ऐका दिवाळीच्या सणाला ।
वाणी देईना तेल साईला ।
पणत्या पाण्यानेच लाविल्या ।
द्वारकामाईत उजेड केला ॥१॥

इच्छा झाली हो चांदभाईला ।
चिलीम प्यावी ती माळरानाला ।
"अल्लामालिक" ध्वनी तो केला ।
अग्नि भूमीत प्रगट झाला ॥२॥

उदीची गरज साईभक्ताला ।
पाठविण्या योजिले बापूगिराला ।
भर रात्रीच्या दोन प्रहराला ।
घोडा अन् गाडी स्वयेच झाला ॥३॥

साई हा भावाचा भुकेला ।
श्रद्धा-सबुरी फुले वाहू त्याला ।
लावू "ॐ श्रीसाई" छंद मनाला ।
गाऊ साईच्या अगाध लीला ॥४॥

॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥

—श्री. विलास तु. पडवळ
१७३।४ शिवनेरी, दादासाहेब फाळके मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

★

# श्रीसाईनाथाय नमः

श्रीगणेशाय नमः श्रीसरस्वत्यै नमः श्रीगुरुभ्यो नमः
श्रीकुलदेवताय नमः श्रीसीतारामचंद्राभ्या नमः श्रीलक्ष्मै नमः
श्रीसद्‌गुरु साईनाथाय नमो नमः

प्रथम वंदू गणपति । चतुर्दश विद्यांचा अधिपति
वक्रतुंड, हेरंब मूर्ति । मंगलाकृति गजमुख ॥१॥

आता नमू ब्रम्हकुमारी । सरस्वती जे चातुर्यलहरी
साई समर्थ चरितामृता । पाजो समस्तां मजकरवी ॥२॥

हा साईच गजानन गणपति । हा साईच परशूहस्ती
घेवूनि करी विघ्न विच्छति । निज व्युत्पत्ति करू कां ॥३॥

हाची भालचंद्र गजानन । हाची एकदंत गजकर्ण
हाची विकट भग्नरदन । हा विघ्नकानन विच्छेदक ॥४॥

हे सर्व मंगल मांगल्य । लंबोदरा गणराया
अभेदरूपा साई सदया । निजसुख माहेरा नेईगा ॥५॥

ऐसिया श्रीसाईनाथा । करुणार्णवा सत्गुरु समर्था
स्वसंवेद्या सर्वातीता । अनाथनंता तुज नमो ॥६॥

प्रणाम तूंते सर्वोत्तमा । नित्यानंदा पूर्णकामा
स्वप्रकाशा मंगलधामा । आत्मारामा गुरुवर्या ॥७॥

करू जातां तुझे स्तवन । वेदश्रुतीही धरिती मौन
तेथें माझे कोण ज्ञान । तुज आकलन करावया ॥८॥

जय जय सत्गुरु करुणाकरा । जय जय गोदातीर विहारा
जय सत्गुरो आनंद घना । ज्ञानस्वरूपा परम पावना ॥९॥

तुझ्या आनंद सागरी । तुजवर उठती नानालहरी
त्याही तूच आवरी । कृपाकरी निज भक्तां ॥१०॥

तदर्थ देवा सद्गुरुसाई । देहाहंता वाहती पायी
आता येथुनी तुझे तू पाही । मी पण नाहीच मजपाशी ॥११॥

घेई माझा देहाभिमान । नलगे सुखदुःखाची आण
इच्छेनुसार निज सूत्राचालन । देवन मन्मना आवरी ॥१२॥

तूच माझा चेतविता । तूच माझी वाचा चाळिता
ते मी कोण गुणगाता । कर्ता करविता तू एक ॥१३॥

तुझा नित्य समागम । हाची आम्हां आगम निगम
तुझे नित्य चरित्र श्रवण । हेच पारायण आमुच ॥१४॥

आता तुझी मानसपूजा । मी करितो श्रीसाईनाथा
ती मान्य करूनि गुरुनाथा । मज आपला म्हणावे ॥१५॥

आनंदाश्रु उष्ण जीवन । करू तेणे चरण क्षालन
शुद्ध प्रेम चंदन चर्चन । करवू परिधान सत् श्रद्धा ॥१६॥

सात्विक अष्टभाव कमल । अष्टदल अतीव निर्मल
मन करूनि एकाग्र अविकल । वाहू निजफल संपादू ॥१७॥

लावू भावार्थ बुक्का माळा । बांधू दृढ भक्तिची मेखला
वाहू पदांगुष्ठी गळां । भोगू सोहळा अलौकिक ॥१८॥

प्रीति रत्नालंकार मंडण । करू सर्वस्व लिंबलोण
करू पंच प्राण चामरांदोलन । ताप निवारण तन्मय छत्रें ॥१९॥
समर्पू ऐशी स्वानंद पूजा । आष्टांग गंध अर्चनाजा
ऐसे आम्ही आमुच्या काजा । साईराया पूजू तुज ॥२०॥

अखंडानुसंधनसूत्र । अनन्य प्रेम पुष्पी विचित्र
गुंफोनि हार मनोहर । अर्पू सादर साईस ॥२१॥

मिळवू स्वराज्य सिंहासन । होऊ स्वपदी विराजमान
भोगू स्वानंद निराभमान । सुखायमान निजांतरी ॥२२॥

धांव पाव गां साईनाथा । ठेवितो तुझ्या चरणी माथा
विसरोनि अपराध समस्ता । निवारी चिंता दासाची ॥२३॥

संसार आहे उदी समान । हे एक उदीचे महिमान
येईल ऐसा एक दिन । मनी आठवण ही ठेवा ॥२४॥

कमल दल समान नश्वर । हा देह होईल पतन
म्हणून याचा त्यागा अभिमान । उदी प्रदान हे दावी ॥२५॥

साईचरणी ठेवूनि प्रीति । जे जे या साईची विभूति
नित्य नेमे लाविती । तेते पावती मनोप्सित ॥२९॥

जडो उत्तम साई संगति । श्रीसाई चरणी निष्काम भक्ति
श्री साईकथा गुणानुसक्ति । निर्मल भक्ति प्रगट हो ॥२७॥

म्हणोनि श्रीसाईचे नाम । तेथेच ठेवा अनुबंधान
अंति तोची कृपानिधान । तापमय शमन करील ॥२८॥

हेमाड श्रीसाईस शरण । अपूर्व हे कथा निरुपण
साईच सवे करी आपण । माझे मी पण फिके ते ॥२९॥

नमो श्रीसाई शिवनंदना । नमो श्रीसाई कमलासना
नमो श्रीसाई मधुसूदना । पंचवदना श्रीसाई नमो ॥३०॥

स्वस्ति श्रीसंत सज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते
श्रीसाईसमर्थ सच्चरिते । सारांश निरुपण समाप्त ॥३१॥

॥श्रीसाईनाथ गुरुदेवार्पण मस्तु ॥

—श्रीमति गुळाणिकर
४६७ क द्वारका, शिवाजी नगर,
हरेकृष्ण मंदिर मार्ग, पुणे १६.

☆

# श्रद्धा साईचरणी

तुझ्या दारी उभा मी साईनाथा ।
आळवितो भक्तिने मी तुजला ॥

प्रसन्न चित्ति देता दर्शन ।
होई निर्मळ भक्तमन ॥

श्रद्धेपोटी धावत येशी ।
सबुरी ठेवून आशिर्वचनी ॥

भक्तांना तू देशी आश्रय ।
तुझाच झाला सदैव जो ॥

नव्हे असत्य वचन कवण ।
दिधला आश्रय अभय वरदान ॥

तुमच्या चरणा नतमस्तक होई ।
सहजच तारुनी जाई या संसारी ॥

श्रद्धेपोटी धावत येशी ।
सबूरी ठेवून आशिर्वचनी ॥

—श्री. राम धनावडे
सुखशांती को. ऑ. हौ. सोसायटी
कन्नमवार नगर, विक्रोळी (पू.)
मुंबई – ४०० ०८३

# शिरडी वृत्त माहे मार्च १९८३

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज शिरडी यांचा श्री रामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे बुधवार दि. २० –४–८३ ते शुक्रवार दि. २२–४–८३ पर्यंत तीन दिवस साजरा झाला. दिवसेंदिवस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात वाढत असल्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये म्हणून संस्थानचे मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी उत्सवाचे तयारीसाठी सर्व खातेप्रमुखांची सभा एक महिना अगोदर घेऊन सर्व कामांचा व खर्चाचा विचार विनिमय केला, व कामाची योजना आखून दिल्या प्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, संरक्षण, साफसफाई, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर कलाकारांची हजेरी, सनई, चौघडा, वाजंत्री, अन्नदान वगैरेची व्यवस्था ठेवणेत आली होती.

उत्सवाचा पहिला दिवस – बुधवार दि. २०–४–८३ रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थानमार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर व साईसच्चरित्र अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४–३० ते ६–३० पर्यंत श्री. मनू महाराज, (ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे शिष्य) जि. नांदेड यांचे कीर्तन झाले. रात्री ७–३० ते ९ व ९–३० ते ११–०० वाजेपर्यंत श्री. अजित कडकडे यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्री ९–१५ ते ११–०० पर्यंत श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या वेळी स्थानिक लोकांनी व भक्त मंडळींनी गारूड भारुड कार्यक्रम केले. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी समाधी मंदिरात आली व शेजारती झाली.

उत्सवाचा मुख्य दिवस – गुरुवार दि. २१–४–८३ रोजी, गुरुवारचा व उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व साईचरित्र ग्रंथ वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणुकीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडी गावातील भाविक मंडळी व बाहेरगावाहून आलेले साईभक्त कोपरगाव मुक्कामी जाऊन रात्री गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६–३० वाजता मा. श्री. काकरेसाहेब यांनी कावडीची पूजा केल्यावर अंदाजे एक हजार कावडींची भव्य मिरवणूक वाजतगाजत गावातून आली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले.

सकाळी १०–३० ते १२–३० पर्यंत ह.भ.प. श्री. मनोहर वासुदेव कोकले गावकर उर्फ मनू महाराज, नांदेड यांचे रामजन्म आख्यान कीर्तन झाले. सायंकाळी ४–०० वा. श्रींच्या निशाणाची व ४–४५ वा. रथाची गावातून मिरवणूक निघाली. रात्रौ १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवले होते.

उत्सवाचा तिसरा दिवस – शुक्रवार दि. २२–४–८३, नित्य कार्यक्रमा-व्यतिरिक्त ह. भ. प. तुकारामबुवा आजेगावकर, परभणी यांचे गोपाळकाला कीर्तन सकाळी १०–३० ते १२–३० पर्यंत झाले. दहीहंडी. माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ १० वाजता शेजारती झाली. रात्रौ नवीन भोजनगृहाच्या मैदानावर "शेगावचे गजानन महाराज" हे नाटक झाले. व उत्सव समाप्त झाला.

हवापाणी :– शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती पुढीलप्रमाणे –

कीर्तन – १) ह. भ. प. श्री शंकर महाराज वडगांवकर, जवळा परभणी.
२) ह. भ. प. प्रमिला द. पैठणकर, नासिक.
३) ह. भ. प. तुकाराम महाराज आजेगावकर, परभणी.
४) ह. भ. प. मनू महाराज, नांदेड (मनोहर वासुदेव कोकलेगावकर)

प्रवचन – १) ह. भ. प. मुरलीधर रामराव देशमुख, शिर्डी.
२) ह. भ. प. जगन्नाथ बुवा वाकचौरे, शिर्डी.
३) ह. भ. प. रघुनाथ कृष्णाजी कारखानीस, पुणे.

भजन, गायन, वादन वगैरे – १) श्री साई भजनी मंडळ, शिर्डी, २) श्री. वसंत दत्तात्रय फुलंब्रीकर, वांद्रा, ३) श्री. वसंतराव दादाराम पवार, शिर्डी, ४) सौ. राजन दिल्ली, ५) श्रीमती ज्योती बहन ए. मनुजा, ६) श्री. ए. एस. मनुजा, ७) श्रीमती राधाबाई सैनानी, ८) कु. रत्ना एच. सैनानी, ९) श्री. जी. ए. देवनानी, ११) श्री. दत्तात्राम लक्ष्मण साठले, मुंबई, १२) श्री. मुकुंद कृष्णाजी म्हात्रे, १२) श्री. श्रीराम विष्णु सातर्डेकर, परेल, १३) डॉ. एम. के. कीर्तिकर, मुंबई, १४) श्री. रघुवीर शांताराम मिराजे, शिर्डी, १५) श्री. अजित कडकडे, मुंबई, १६) श्री. दत्ता जोगदंडे, १६) श्री. साई बँकर, १७) श्री. कृष्णा चारी, १८) श्री. एस. के. कुलकर्णी, नगर, १८) श्री. रामदास दत्तात्रय दैठणकर, २०) श्री. दिलीप शंकर

मुकुंद साळवणे, २१) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई, २२) श्री. रघुनाथ सांडभोर पुणे, २३) श्री. सुधाकर कामतेकर, मुंबई, २४) गजरे बाई, २५) सुधा, आंध्र प्रदेश, २६) मनोरमा बाजेपे, कानपूर, २७) गौरी बाजेपे, कानपूर, २८) सरोज शुक्ला, २९) श्री. अशोक, ३०) सुभाष मुकुंद मुनसे, अंधेरी, मुंबई, ३१) श्री. वसंत धुमकर, मुंबई, ३२) अहमद पठाण, शिर्डी, ३३) नंदकिशोर पुरोहित, बडोदा, ३४) डॉ. आय. रामाचारी, हैद्राबाद. ३६) श्री. हरकचंद चंद्रभान, ३६) श्री. सुहास सदाशीव क्षीरसागर, ३८) श्री. पारसमल चंपालाल पोरवाल, ३८) श्री. निलेश भिवंडकर, ३९) श्री. जी. एल. चौधरी, अनंतपूर, ४०) श्री. महेश राणे, मुंबई, ४१) श्री. यादव, मुंबई, ४२) श्री. मुकेश शिर्के, ४३) श्री. सदानंद परचुरे, ४४) श्री. बाळासाहेब कुलकर्णी, लक्ष्मीवाडी, ४५) अन्नपूर्णादेवी, शिर्डी, ४६) मनीबाई, शिर्डी, ४७) कृष्णराव , शिर्डी, ४८) अंजय्या, हैद्राबाद, ४९) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, ५०) श्री. ललीतकुमार , शिर्डी, ५१) श्री. दिगंबर उद्धव, आखडेकर, राहाता, ५२) श्री. शशिकांत दत्तात्रय जोशी, ५३) श्री. अरुण सोमानी, संगमनेर, ५४) श्री. प्रकाश बरडे, संगमनेर, ५५) श्री. पिसे, बार्शीकर, बार्शी, ५६) श्री. महादेव दत्तात्रय संगमनेर, ५७) श्री. नारायण राजेंद्र चांडोळे, ५८) श्री. शिवाजी रामभाऊ पांढरे, करमाळा, ५९) श्री. महेश्वर अनंत, मुंबई, ६०) श्री. यादव जाधव, ६१) श्री. बाळा पिलाजी गुरव, शिर्डी, ६२) श्री. शिवराम बाबुराव बिडवे, संगमनेर, ६३) श्री. भिडे, ६४) सखाराम राघुजी गुरव, कोपरगाव, ६५) श्री. भीमराव शिंदे, बनसोडे, साकुरी, ६६) श्री. यशवंत पुरुषोत्तम रानडे, कोपरगाव, ६७) श्री. जादुसिंग मुसमान ठाकूर, ६८) श्री. एम. किसन , हैद्राबाद, ६९) श्री. एफ. ए स. चौरासे, भिलाई, ७०) श्री. रामभाऊ सातारकर, चंद्रकांत ढवळपूरकर मंडळ, ७१) ताराबाई मुनशी, ७२) श्री. ज्ञानोबा तात्याबा वाडेकर, कोपरगाव, ७३) श्री. बापूराव तुकाराम कांबळे, ७४) श्री. शिवाजी तुकाराम दुधाळ, शिर्डी, ७५) श्री. दत्तोपंत लखे, ७६) श्रीमती लीलावती गुजराथी शिर्डी, ७७) श्री. दत्तात्रय नाईक, तुकाराम खेडकर, लोकनाट्य मंडळ, ७८) श्री. रामदास भाऊसाहेब व कलाकार, ७९) श्री. विश्वनाथ किसन खेड, ८०) श्री. वसंत दामोदर रासने, पुणे, ८१) श्री. दत्तात्रय दामोदर रासने, पुणे, ८१) श्री. वसंत जोशी, मुंबई व भक्त ८२) श्री. यशवंत नाईक, ८३) श्री. विलास पावसकर, ८४) श्री. दत्ता कदम, ८५) श्री. शशिकांत राऊळ, ८६) श्री. एस. बी. नारकर, ८७) श्री. शशांक तावडे, ८८) श्री. शशिकांत चव्हाण, ८९) श्री. हरीभाऊ वाटगे, ९०) श्री. चंद्रकांत कोकम, ९१) श्री. विलास महाडीक, ९२) श्री. शशी दळवी, ९३) श्री. सुरेश हिर्लेकर, ९४) श्री. सुरेश आंजर्लेकर, ९५)

९५) श्री. बारकू शेठ, ९६) श्री. रवी सातघरे, ९७) श्री. रघुनाथ नागरे, ९८) श्री. शांताराम भिराणे, ९९) श्री. मधुकर भालेराव, शिर्डी, १००) श्री. आनंद दत्तात्रय करंबेळकर, मुंबई, १०१) श्री. चतुर्धन नागरे, शिर्डी, १०२) बारावकर काका, १०३) श्री. माणिक साळी, १०४) रोवर्स अँड रेंजर्स वेस्टर्न रेल्वे, मुंबईचे स्काऊट व गाईड्स – श्री. वाय. के. करले १०५) श्री. व्ही. एस. घुमकर, १०६) श्री. इ. एम. भोसले, १०७) श्री. एन. सी. परीख, १०८) श्री. भगूभाई बी., १०९) श्री. नारायण एस. राणे, ११०) श्री. उदय पाटील, ११०) श्री. मगनलाल के. १११) श्री. मधुसूदन गावडे, ११२) श्री. अशोक एल. ११३) श्री. देवेंद्र पी. ११४) श्री. शांताराम बी. ११५) श्री. एस. एस. मूर्ती, ११६) श्री. प्रदीप एल. ११७) श्री. कुंदन के. ११८) श्री. सुरेश बी. ११९) श्री. गणपत एस. १२०) श्री. एस. के. भोगले, १२१) श्री. जी. टी. सूर्यवंशी, १२२) श्री. पी. मलकानी, १२३) श्री. ए. एस. बक्षी, १२१) श्री. ए स. बी. राजावट, १२५) श्री. पी. डी. सावंत १२६) श्री. बी. पी. चावला, १२७) श्री. एफ. एस. ख्रिस्तोफर, १२८). श्री. संतनु आंबेकर, १२९) श्री. मधू उपसकर, १३०) श्री. सुनील राणे, १३१) श्री. आर. एस. कटीयार, १३२) श्री. पी. जी. गीयल, १३३) श्री. सुरेश जे. १३४) श्री. रामलखन जी. १३५) श्री. केशरलाल बी., १३६) श्री. ए. के. देवले, १३७) श्री. व्ही. जी. गायकवाड, १३८) श्री. रघुराज बैरागी, १३९) श्री. महेंद्र सिंग, १४०) श्री. एम. ए. जोशी, १४१) कु. एन. एस. त्रिवेदी, १४२) सौ. गीता मेहता, १४३) कु. जमना खटनहार, १४४) कु. रेखा जोशी, १४५) सौ. सुनीता देसाई, १४६) कु. उषा दाणी, १४७) कु. गीता एस. १४८) कु. मैथीली १४९) कु. भारती मेहता, १५०) कु. हेमलता पटेल, १५१) कु. पी. मैथीली, १५२) सौ. बीना मलकानी, १५३) कु. अनामिक आंबेकर, १५४) सौ. भारश्री आंबेकर, १५५) ह.भ.प. दामोदर वासुदेव भंडारकवडे, पंढरपूर, १५८) श्री. विवेक मुळे, मुंबई, १५९) श्री. विलास परळकर, मुंबई, १६०) श्री. सुभाष जयवंत कांबळी, मुंबई, १६१) श्री. कुमारसेन गुप्ते, शेगावचे गजानन महाराज नाटकाचे सादरकर्ते, १६२) श्री. हेमंत चिटणवीस, मुंबई, १६३) कै. कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजरवाडीकर लोकनाट्य तमाशा मंडळ, १६४) शेगावचे गजानन महाराज नाटकाचे कलाकर – श्री. दीनानाथ लाड, १६५) श्री. किशोर दांडेकर, १६७) श्री. अरुण मडकर, १६८) श्री. मधूसूदन आंगणे, १६८) श्री. दत्ता खराडे, १७०) श्री. शशी सकपाळ, १७१) श्री. बळीराम गमरे, १७२) श्री. श्रीराम महाडीक, १७३) श्री. अनंत धुरी, १७४) श्री. मनोहर सावंत, १७५) श्री. विजय भालेकर, १७६) श्री. अभिनंदन पाटील,

१७७) श्री. सिद्धेश गुप्ते, १७८) श्री. विलास रोकडे, १७९) श्री. मधुकर शंखपाल, १८०) श्री. भास्कर जगताप, १८१) श्री. श्रीकांत कुलकर्णी, १८२) श्री. प्रकाश गावडे, १८३) श्री. दत्ता पाटील, १८४) श्री. अण्णा सकरे, १८५) कु. नयन नाईक, १८६) कु. नंदा सोनवणे, १८७) कु. आरती गुप्ते, १८८) कु. संगीता गुप्ते, १८९) सौ. मंगला जोशी, १९०) श्री. दत्ता राणे, १९१) श्री. शांता-सुर्वे, १९२) श्री. शंकर कांबळी, १९३) श्री. सुनील कांबळी, १९३) सौ. विद्या खांडवे, उमरावती, १९४) श्री. नारायण वासुदेव फळ, मुंबई, १९५) श्री. श्री. मोहन खांडवे, १९६) श्री. सुरेश मारुती भोसले, नातेपुते, १९५) श्री तानाजी लक्ष्मण पाले, पंढरपूर, १९८) पंडित तुकाराम घुमाळ, १९९) श्री. नाना कृष्णा वाडेकर, बारामती.

रंगपंचमी – सालाबादप्रमाणे श्रींच्या रथाची मिरवणूक दि. २–४–८३ रंगपंचमीचे दिवशी सायंकाळी ५ वा. गावातून फिरून आल्यावर ७–०० वाजता धुपारती झाली.

## श्री. दाजीबा मोरे यांचे देहावसान

श्रीसाईलीला मासिक ज्या छापखान्यात छापले जाते त्या छापखान्याचे मुद्रक मालक श्री. पांडुरंगराव मोरे यांचे वडील दाजीसाहेब कोंडाजी मोरे यांचे गुरुवार ता. १२ मे ८३ रोजी मौजे पळू ता. मुरबाड येथे वृद्धापकाळामुळे निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ८० चे पुढे होते. ते साईभक्त होते व परमेश्वर चिंतनात आपला वेळ खर्च करीत असत. त्यांचे पश्चात चार पुत्र व दोन कन्या व नातवंडे, मित्रपरिवार आहे.

श्रीसाईबाबा मृतात्म्यास चिरशांति व सद्गती देवोत.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईसच्चरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=००
( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ.क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | २=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पंच्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४